cmyk



दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

घटस्थापना

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१६८ | बुधवार, दि. ९ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# भाजपचे धोरण शेतकऱ्याला उद्ध्वस्त करणारे !

## नाना पटोले यांचा केंद्रासह राज्यसरकारवरही हल्लाबोल

**मुंबई । प्रतिनिधी**

**गेल्या १० वर्षांपासून केंद्रामध्ये भाजपचे सरकार आहे. २०१४ च्या निवडणुकीत नरेंद्र मोदींनी आश्वासन दिले होते की, पंतप्रधान झाल्यानंतर पहिली सही शेतकरी कर्जमाफीच्या फाईलवर करेन, त्याच बरोबर डॉ.स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू केल्या जातील, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट केले जाईल. मात्र १० वर्षानंतरही हा सर्व चुनावी जुमला असल्याचे दिसते. भाजपचे धोरण हे शेतकऱ्यालाच उद्ध्वस्त करण्याचे आहे, असे सांगत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपने शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाचा पाढा वाचला.**

दहा वर्षांपूर्वी म्हणजे २०१४ साली केंद्रात आणि राज्यात भाजपचे सरकार आले होते. पंतप्रधान मोदींनी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या मालाला उत्पादन खर्चाच्या दुप्पट भाव देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात शेतीमालाला १० वर्षात एकदाही दुप्पट भाव मिळाला नाही. राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढल्या. यावर ना पंतप्रधान बोलतात ना उपमुख्यमंत्री फडणवीस.



राज्यातील शेतकरी आज अनेक समस्यांचा सामना करत आहे. शेतमालाला भाव मिळत नाही, माल निर्यात करता येत नाही. मात्र सरकार काहीही पावले उचलताना दिसत नाही. या वर्षी राज्यात अतिवृष्टीने प्रचंड नुकसान झाले. अशा वेळी शेतकऱ्यांना मदत देण्याची गरज असताना भाजपने तेलंगणाला ४ हजार कोटींची पॅकेज जाहीर केले. मात्र महाराष्ट्राला फुटकी कवडी दिली गेली नाही. भाजप शेतकरी विरोधी असल्याचा हा सर्वात मोठा पुरावा असल्याचे नाना यांनी सांगितले. विधानसभा निवडणुका जवळ येताच पंतप्रधान मोदींचे महाराष्ट्र दौरे वाढले आहेत. या दौऱ्यात ते अन्य सर्व विषयांवर बोलतात मात्र शेतकरी आणि त्यांच्या प्रश्नावर ते एक शब्दही बोलत नाहीत. राज्यातील सोयाबीन, कापूस, ऊस, कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत असताना भाजपवाले हिंदू – मुस्लिम तेढ निर्माण करण्यात व्यस्त असल्याचा आरोप नाना पटोले यांनी केला. लोकसभा निवडणुकीपूर्वी कांदा निर्यातबंदीचा सरकारचा निर्णय चुकीचा होता, याची कबुली अजित पवारांनी दिल्याची आठवण नाना पटोले यांनी करून दिली. वर्ध्यात झालेल्या एका सभेत मोदींनी सोयाबीनला १० हजार भाव देऊ असे जाहीरपणे सांगितले होते. भाजपाचे जे लोक विरोधात असताना सोयाबीनला ६ हजार भाव मिळावा म्हणून आंदोलन करत होते ते आज सत्तेत आल्यानंतर मात्र फक्त ४ हजार भाव देत आहेत. जास्त उत्पादन खर्च आणि कमी दर यामुळे राज्यातील सोयाबीन उत्पादन शेतकऱ्यांना २० हजार कोटींचा फटका बसला आहे. राज्यातील महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या हिताच्या आड येणारे असल्याचा हा आणखी एक पुरावा असल्याचे नाना पटोले यांनी दाखवून दिले.

शेतकरीच जगाचा पोशिंदा असून त्याला न्याय मिळाला पाहिजे, असे सांगणाऱ्या भाजपनेच शेतकऱ्यांच्या विरोधातील तीन कायदे आणले आणि त्याविरोधात आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना खलिस्तानी, नक्षलवादी, अतिरेकी ठरवण्यात आले. गेल्या १० वर्षात खतांचे भाव वाढले, डिझेलचे दर वाढले, बी-बियाणांचा भाव वाढला मात्र शेतकऱ्यांच्या मालाचा भाव काही वाढला नाही. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर शेतकऱ्यांच्या हिताची काळजी घेतली जाईल, असे आश्वासन नाना पटोले यांनी दिले आहे.

## हरिणायात तिसऱ्यांदा भाजप

### जम्मू काश्मीरच्या जनतेची काँग्रेस आघाडीला साथ

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

हरियाणा आणि जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीची मतमोजणीत दोन्ही राज्यांचा जनतेचा



कौल स्पष्ट झाला आहे. हरियाणामध्ये तिसऱ्यांदा भाजपने सत्ता स्थापनेसाठीचा बहुमताचा आकडा गाठला आहे तर जम्मु काश्मीरमध्ये ओमर अब्दुल्ला आणि काँग्रेस पक्षाने मिळून बहुमताचा आकडा गाठला आहे.

हरियाणामध्ये भाजप ४८ तर काँग्रेस ३६ जागा मिळाल्या आहेत. मागच्या वेळे पेक्षा काँग्रेसच्या ५ जागा वाढल्या तर, भाजपाच्या ८ जागा वाढल्या आहेत. हरियाणाच्या ग्रामीण भागात काँग्रेसच्या आमदारांना चांगली साथ मिळाली आहेत तर शहरी मतदारांनी भाजपला साथ दिल्याने त्यांनी बहुमताचा आकडा पार केला.

हरियाणातही जाट समाजाकडून भाजपला साथ मिळणार नाही असे निवडणुकीपूर्वी बोलले जात होते परंतु भाजपला जाट समाजाने चांगलीच साथ दिल्याचे दिसून येत आहे. जम्मू आणि काश्मीरमध्ये, एनसी आणि काँग्रेस आघाडीने ५२ जागांवर आघाडी घेत बहुमताचा आकडा ओलांडला, तर सत्तेत असलेल्या भाजपला काश्मीर जनतेने नाकारल्याने २९ जागा मिळाल्या आहेत. मेहबुबा मुफ्ती यांचा पक्ष पीडीपीला अवघ्या ४ जागांवर समाधान मानावे लागले आहे.

# धनगर एसटी आरक्षणाचा जीआर तात्काळ काढा !

## आंदोलक वर्षा निवासस्थानी; जोरदार घोषणाबाजी करीत निर्वाणीचा इशारा

**मुंबई । प्रतिनिधी**

**धनगर बांधवांनी मंगळवार दि.८ रोजी वर्षा निवासस्थानासमोर प्रचंड घोषणाबाजी करीत आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी सरकारला निर्वाणीचा इशारा दिला. सरकारने धनगर एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीचा जीआर तात्काळ काढावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.**

धनगर आरक्षणाचा मुद्दा तापत चालला आहे. मंगळवारी सकाळी आंदोलकांनी मंत्रालयातील जाळ्यांवर उड्या घेतल्यानंतर सायंकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्याबाहेर आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी करत सरकारचा निषेध केला. वर्षा निवासस्थानाबाहेर आंदोलन करणाऱ्या धनगर बांधवांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे वर्षा निवासस्थानी जाणार आहेत. धनगर आरक्षणाच्या बाबतीत सरकार काय निर्णय घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. याच मुद्द्यावरून धनगर समाज

◀◀ पान २ वर



### धनगड दाखले रद्द करण्याचा अधिकार या सरकारला नाही – नरहरी झिरवळ

धनगड दाखले रद्द करण्याचा अधिकार या सरकारला नाही. त्यामुळे या निर्णयाला आम्ही न्यायालयात आव्हान देणार आहोत. जर धनगड दाखले रद्द होऊ शकतात, तर आदिवासींमधील बोगस दाखलेही रद्द करा. या विषयावर आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहोत, विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी म्हटले आहे.

### धनगड जातीचे सहाही दाखले रद्द

धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याच्या मागणीसाठी धनगर आणि धनगड एकच असल्याचा दावा केला गेला. मात्र, संभाजीनगरात सहाजणांना धनगड जातीचे प्रमाणपत्र वितरित केल्याचे लक्षात आल्याने उच्च न्यायालयात धनगड-धनगर एक असल्याचा दावा फेटाळला गेला. आता धनगड जातीची ही प्रमाणपत्रेच रद्द करण्यात आली आहेत. एकदा दिलेला दाखला रद्द करण्याचा अधिकार जात पडताळणी समितीला नव्हता. तो अधिकार जात पडताळणी समितीला देऊन जे धनगडांचे बनावट दाखले काढले होते ते सहा दाखले रद्द करण्यात आले.

### प्रकाश शेंडगे यांचा शासनाला इशारा

धनगरांना एसटीचे आरक्षण देण्याचा निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यासाठी सुधाकर शिंदे समितीचा अहवाल तातडीने स्वीकारले जाणे आवश्यक आहे. या समितीने पाच दिवसांपूर्वीच आपला अहवाल सादर केला आहे. मात्र यंत्रणेला वेळ नाही, मुख्यमंत्र्यांचे दुर्लक्ष होत आहे, असा आरोप ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी केला. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, ओबीसी कल्याण विभागाच्या विनिती सिंगल यांना आम्ही आमच्या भावना पोहोचवल्याचेही शेंडगे म्हणाले.

## माळ सातवी



सप्तमीचे दिवशीं
सप्तश्रृंगगडावरी हो ।
तेथें तं नांदसी
भोंवती पष्पें नानापरी हो ।
जाई जुई शेवंती पूजा
रेखियली बरवी हो ।
भक्त संकटी पडता
झेलुनी घेसी वरचेवरी हो ।। उदो ०
।। ७।।
उदो बोला उदो
अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णू तिचा हो ।।

## गोशाळांच्या अनुदानाला राज्य सरकारची मान्यता

### अनुदान बँक खात्यावर

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या गायींना प्रति दिवस प्रति गोवंश ५० रुपये अनुदान देण्यासाठी राज्य सरकारएन मान्यता दिली आहे. मागच्या आठवड्यात मंत्रिमंडळ बैठकीत या निर्णयाला मंजूरी देण्यात आली होती. आता राज्य सरकारने याबाबतचा शासन निर्णय मंगळवारी (ता.८) प्रसिद्ध केला आहे. त्यामुळे गोशाळांना आता अनुदान मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

राज्यातील २०१५ पासून गोवंश हत्या प्रतिबंध कायदा लागू आहे. या कायद्यानुसार शेतीकामासाठी

◀◀ पान २ वर

## मच्छिंद्रनाथ गडाप्रमाणे, रेणूकाई देवस्थान येथे भाविक-भक्तांना सुविधा देणार -सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

मतदारसंघातील सावरगांव मच्छिंद्रनाथ गड,आष्टी पिंपळेश्वर मंदिर,नागतळा नागनाथ देवस्थान, पिंपळवंडी आश्वलिंग देवस्थान,वाळूंज भैरवनाथ देवस्थान, मुर्शदपुरचे माऊली मंदिर या सर्व देवस्थान साठी आपण भरभरून निधी दिला आणि त्याप्रमाणेच बेलगांवच्या रेणूका मातेच्या विकासाची भरभरून



निधी दिला आणि भविष्यात हे मोठे तिर्थ स्थळ करण्यासाठी आपण कायम प्रयत्नशील असल्याचे

◀◀ पान २ वर

## एसटीची एक महिन्यासाठी १० टक्के भाडेवाढ

मुंबई । प्रतिनिधी

दिवाळीतील प्रवाशांची गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळाने १० टक्के हंगामी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. २५ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर दरम्यान तब्बल एका महिन्यासाठी ही भाडेवाढ असणार आहे. वा भाडेवाढीमुळे महामंडळाच्या तिजोरीत सुमारे ९५० ते एक हजार कोटीचा महसूल जमा होईल. भाडेवाढीमुळे राज्यातील नागरिकांचा एसटीचा लांब पल्याचा प्रवास ७० ते १००० रुपयांनी

◀◀ पान २ वर



## वृद्धांची आणि महिलांची हेळसांड कराल तर याद राखा!

### राजेभाऊ फड आक्रमक; बँक अधिकाऱ्यांना घेतले फैलावर

परळी । प्रतिनिधी

शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून बँक खात्यावर पैसे जमा झालेले आहेत. सणासुदीचे दिवस असल्याने हे पैसे काढण्यासाठी बँकेत हजारोंच्या संख्येने दररोज गर्दी होत आहे. मात्र केवायसी नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. झालेच तर प्रतिदिन केवळ ५० ते ५५ एवढ्याच केवायसी होत असल्याने रात्री – अपरात्री बँकेसमोर रांगा लागत आहेत.

◀◀ पान २ वर



## केजवासीयांचे स्वप्न पूर्ण होत असल्याचा आपल्याला मनस्वी आनंद – आ. मुंदडा

### केज येथे सांस्कृतिक सभागृहाची पायाभरणी, क्रीडा संकुलाचे भूमिपूजन

**केज । प्रतिनिधी**

केज शहरात लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या नावाने सांस्कृतिक सभागृह व तालुका क्रीडा संकुल उभारणीतून केजवासीयांचे स्वप्न होत असल्याचा मनस्वी आनंद होत आहे. हे सभागृह ६०० आसन क्षमतेचे सर्व सोयी – सुविधांचे होत असल्याने कलाप्रेमींना सांस्कृतिक व्यासपीठ



उपलब्ध होणार आहे. तर क्रीडा संकुलात विविध खेळांच्या मैदानाचे नियोजन करण्यात आल्याने ग्रामीण खेळाडूंना घडण्यास मदत होणार आहे. असे प्रतिपादन आ. नमिता मुंदडा यांनी केले.

केज शहरातील लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे सांस्कृतिक सभागृहाची

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०५ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.०० क्विंटल | २,६३६ | ३,२५० | २,९७८ |
| ज्वारी/हायब्रिड :६४.०० क्विंटल | २,०५० | २,४०१ | २,२१० |
| मूग : २.५० क्विंटल | ६,४०० | ६,८५१ | ६,६२५ |
| तूर :१.०० क्विंटल | ७,००० | ८,९३० | ७,९६५ |
| उडीद : ३३.५० क्विंटल | ६,५०१ | ७,६०० | ७,०६७ |
| बाजरी : ८.०० क्विंटल | २,२६४ | २,६६१ | २,४६१ |
| मुग : ११.०० क्विंटल | ६,७०० | ७,३०० | ६,९६३ |
| सोयाबीन: ६६८.०० क्विंटल | ३,१०१ | ४,३२० | ३,८०१ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ७,५०० | ७,५०० | ७,५०० |

# सरकारची तिजोरी रिकामी झाली ! आता एक लाख कोटीचे कर्ज काढण्याचा घाट

**मुंबई । प्रतिनिधी**

**निवडणुकांवर डोळा ठेवून 'लाडकी बहीण' व अन्य खिरापत वाटणाऱ्या योजनेसाठी करण्यात येत असलेल्या खर्चामुळे राज्य सरकारची तिजोरी आता रिकामी झाली आहे. कर्जाच्या वाढत्या बोजामुळे तिजोरीत होत असलेला खडखडाट आणि निधीच्या टंचाईवर मात करण्यासाठी राज्य सरकारने निधी मिळविण्याचे व पर्यायी उत्पन्नाचे मार्ग शोधणे सुरू केले आहे. एकीकडे मुद्रांक शुल्काच्या नियमात बदल करून २ हजार कोटींचा महसूल मिळविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून, दुसरीकडे १ लाख कोटीहून अधिकचे कर्ज उभारण्याचे प्रयत्न सरकारतर्फे केले जात आहेत.**

राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना वित्त मंत्री अजित पवार यांनीच मार्च २०२५ पर्यंत राज्यावरील कर्ज ७.८२ लाख कोटींपर्यंत पोहोचेल, अशी माहिती दिली होती. विधानसभा निवडणुका जिंकण्यासाठी विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांना दिलेली मंजुरी आणि विविध समाजघटकातील मतदारांना खुश करतील, अशा लाडकी



बहीणसारख्या योजनांमुळे यावर्षी अचानक ९६ हजार कोटींचा भार राज्याच्या तिजोरीवर पडला आहे. त्यामुळे राज्याची अर्थसंकल्पीय तूट २ लाख कोटींवर पोहोचली आहे. २०४-२५ या वर्षात कर्ज दायित्वाची मर्यादा ही ८० हजार ६६७ कोटी आहे. मात्र, राज्याने चालू आर्थिक वर्षात आजवर १ लाख ५० हजार कोटींहून अधिक रकमेचे कर्ज उचलले आहे. राज्य सरकारने सादर केलेल्या अर्थ संकल्पात ठरविण्यात आलेल्या लक्ष्यानुसार मुद्रांक शुल्काच्या माध्यमातून ५५ हजार कोटी जमा होतील, असा अंदाज वर्तविण्यात आला आहे. ऑगस्ट पर्यंत २२ हजार ४७८ कोटी जमा झाले आहेत. या महसूलात वाढ करण्यासाठी दस्त नोंदणीसाठी किमान दर १०० रुपये दर बदलून आता त्याहून अधिक दर आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### लाडकी बहीण योजनेचा सर्वाधीक भार

लाडकी बहीण योजनेसाठी लाभार्थी महिलांना दर महिन्याला ३ हजार ६२० कोटींची गरज आहे. वर्षासाठी हा खर्च ४३ हजार ४४० कोटी रुपये आहे. योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या २ कोटी २२ लाख १२ हजार ७२९ वर पोहोचली आहे. त्यामुळे या २.२२ कोटींहून अधिक लाडक्या बहिणींना ९ हजार ९९५ कोटींहून अधिकची रक्कम सरकारला द्यावी लागणार आहे.

cmyk

## अग्रलेख

# बेजबाबदार उधळपट्टी !

राज्यात आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीचे सरकार सत्तेवर येईल, हे निश्चित असून २०२९ मध्ये होणाऱ्या निवडणुकीत भाजपचे स्वबळावर सरकार आणण्यासाठी जोमाने काम करा, असे आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी चार दिवसांपूर्वी मुंबई दौऱ्यात पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीत केले होते. या आवाहनामुळे भाजपची शिवसेना (एकनाथ शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या बरोबरची युती पुढील निवडणुकीत तुटणार असल्याचे जाहीर संकेत मिळाले आहेत. अजित पवार यांना सत्तेत सहभागी करून घेतल्याने भाजप नेते व कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढली असतानाच शहा यांनी हे वक्तव्य केल्याने शिंदे व अजित पवार गटाचे भवितव्य काय, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

२०२९ मध्ये पुन्हा राज्यात शत-प्रतिशत भाजपचे सरकार आणायचे होते तर मागील काळात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे पक्ष का फोडले? डागाळलेल्या नेत्यांना, मंत्र्यांना भाजपच्या वॉशिंग मशिनमध्ये धुवून पक्षात सामील का केले? फोडलेले हे दोन्ही पक्ष २०२९ पर्यंत भाजपमध्ये विलीन होणार आहेत काय? अजित पवार यांना सत्तेत सहभागी करून घेतल्याने भाजप नेते व कार्यकर्त्यांमध्ये नाराजी वाढली आहे त्याचाच हा परिपाक असावा. २०२९ मध्ये पुन्हा भाजप शत-प्रतिशतच्या नाऱ्यामुळे अमित शहा आदी भाजप नेत्यांची मग्रुरी कमी झाल्याचे दिसत नाही. मागील आठवड्यातील महाराष्ट्र भेटीत अमित शहा यांनी आपल्या भाषणात 'इनकमिंगची चिंता नको', 'फोडा-जोडा आणि जिंका' असा संदेश कार्यकर्त्यांना दिला होता. एकीकडे २०२९ ला शत-प्रतिशत भाजपचे सरकार येणार असेल तर मग दुसरीकडे फोडा-जोडा हे ब्रिटीश पद्धतीचे, पक्ष फोडाफोडीचे राजकारण कशासाठी? प्रत्येक राज्यात स्थानिक पक्षांशी युती करायची नंतर जम बसवून त्या पक्षाला नेस्तनाबूत करायचे हेच भाजपचे काम आहे. शत-प्रतिशतचा नारा देऊन शिंदे, अजित पवार यांना बाजूला सारणार असल्याचेच संकेत देण्यात आलेले आहेत. या दोन्ही पक्षांची इतकी हतबलता आहे की, या विधानावर ते भाष्यसुद्धा करू शकत नाहीत.

लोकसभेचे निकाल पाहता आणि शरद पवार गटात होणारे इनकमिंग पाहता हे शक्य नाही. प्रलोभने दाखविणाऱ्या योजना आणल्या, फोडाफोडी केली, इतर पक्षांतील भ्रष्ट लोकांना आपल्या पक्षात घेऊन महत्त्वाची पदे दिली, हे मुद्दे लोक विसरत नाहीत त्यामुळे शत-प्रतिशत भाजप हा नारा महाराष्ट्रापुरता स्वप्नवत राहणार असेच दिसते. एकाच मंत्रिमंडळ बैठकीत शेकडो निर्णय घेणाऱ्या महायुती सरकारला सत्ता जाण्याच्या भयगंडाने चांगलेच ग्रासले आहे. अगदी भ्रमिष्ट झाल्यासारखा त्यांचा कारभार सुरू आहे. देशी गायीला आता राज्यमाता-गोमाता असा दर्जा देण्यात आला आहे. सत्ता जाण्याच्या भीतीने सरकारने नवनवीन योजनांची बरसात सुरू केली आहे. राज्यावर कोट्यवधींचे कर्ज असताना सरकार करदात्यांच्या जीवावर जणू स्वत:च्या खिशातले देत असल्याच्या अविर्भावात पैशांची उधळपट्टी करीत आहे. सरकारच्या तुघलकी निर्णयांमुळे राज्याच्या तिजोरीवर प्रचंड ताण पडू शकतो; पण सत्ताप्राप्तीसाठी महाराष्ट्र दिवाळखोर झाला तरी चालेल, असाच एकंदरीत दृष्टिकोन दिसतो.

२८ जूनला विधिमंडळात राज्याचा अर्थसंकल्प सादर झाला आणि गंभीर बाब म्हणजे एका आठवड्यातच सरकारने ९४ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. हे सारे धक्कादायक आणि वित्तीय बेजबाबदारपणाचे लक्षण होते आहे. विधिमंडळाच्या इतिहासातील या सर्वाधिक रकमेच्या पुरवणी मागण्या होत्या. कोणतीही चर्चा न होता त्या मंजूर झाल्या. राज्यावर ७ लाख कोटी रुपयांहून अधिक कर्ज आहे. गत आर्थिक वर्षात सुमारे २० हजार कोटी रुपयांची तूट झाली. यंदा ही तूट २४ हजार कोटींवर जाईल, असा अंदाज आहे. एकूण वित्तीय तूट १ लाख १० हजार ३५५ कोटींवर गेली आहे, असे असूनही उधळपट्टी सुरू आहे. धर्म आणि द्वेष ही राजकीय पक्षांची आवडती आयुधे आहेत. गायीला राज्यमातेचा दर्जा दिल्याने लोकांना गायीचे महात्म्य पटेल, असा बालिश विचार या निर्णयामागे दिसतो. उत्तर प्रदेश सरकारनेसुद्धा असाच निर्णय घेतला होता; परंतु गायींची परवड काही थांबली नाही. निवडणुकीच्या तोंडावर देशी गायींचे महत्त्व शंकराचार्यांनी राज्य सरकारला पटवून दिले आणि त्यांच्या सल्ल्यानुसार गायीला राज्यमातेचा दर्जा बहाल करून राज्य सरकारने पुण्याची कमाई केली आहे.

राज्यात ८२८ नोंदणीकृत गोशाळा असून सुमारे दीड लाखांपेक्षा अधिक गायींचे संगोपन या गोशाळा करतात. राज्य सरकारच्या तिजोरीतून प्रती गाय ५० रुपयेप्रमाणे महिन्याकाठी कोट्यवधी रुपयांपेक्षा जास्त खर्च होणार आहे. नात्यातील मतांची उपयुक्तता ओळखून 'लाडकी बहीण'पासून सुरू झालेला प्रवास 'राज्यमाता'पर्यंत येऊन पोहोचला आहे. केंद्र सरकारने अनेक दशकांपासूनची मराठी जनतेची मागणी असलेल्या मराठी भाषेला 'अभिजात दर्जा' देण्याचा निर्णय घेऊन मराठी जनांना आनंदी केले. विधानसभा निवडणुकीचा हा परिणाम असावा. राज्य सरकारच्या डोक्यावर मोठे कर्ज असूनदेखील सुमारे १ लाख कोटी खर्चाच्या नवीन प्रमुख योजना जाहीर झाल्या आहेत. आचारसंहिता लागण्यापूर्वी सरकार शासन निर्णय जाहीर करण्याचे नवे विक्रम करीत आहे. राज्य सरकार इतक्या वेगाने काम करीत असेल तर दर ५ वर्षांऐवजी दरवर्षी महिन्याला निवडणुका घ्यायला हव्यात.

# राज्यात महिलेला सन्मान व न्याय देण्याचं काम महायुती सरकारने केले - खा. डॉ. श्रीकांत शिंदे

**जालना । प्रतिनिधी**

**राज्यामध्ये महिलेला सन्मान व न्याय महिला सक्षमीकरणासह सर्व समाजघटकासाठी महायुती सरकारने कामे केली असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी महायुतीसोबत रहा असे आवाहन खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांनी जालना येथे बोलताना केले. ते जनसंवाद यात्रे निमित्ताने जालना येथे आले असता मामा चौक पसिरात झालेल्या विराट जनसमुदायास संबोधीत करतांना त्यांनी हे आवाहन केले.**

त्याचबरोबर केंद्रात एनडीएचे सरकार आणि महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आहे त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे कुणी आणले किंवा मंजुर केले जे काम केले असेल ते माजी राज्यमंत्री खोतकर यांनी मेडीकल कॉलेजसह विविध उद्योगधंद्यांसाठी राज्याकडे पाठपुरावा केला असल्याचेही ते म्हणाले. यावेळी व्यासपीठावर खा. संजय निरुपम, माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर, युवा सेनेचे अभिमन्यू खोतकर, पंडीत भुतेकर, भाऊसाहेब घुगे आदींची उपस्थिती होती. प्रसंगी जिल्ह्यातील विविध पक्षातील पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. यावेळी बोलतांना डॉ. शिंदे म्हणाले की, मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना व लेक लाडकी योजनेच्यामाध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महिला सक्षमीकरणाचे काम केले आहे. लाडकी बहिण योजनेची घोषणा झाल्यानंतर आता पाचवा हफ्ताही



खात्यात जमा झाला आहे. यापुर्वी कोणत्याही सरकारने असा निर्णय घेतला नाही जो निर्णय मुख्यमंत्री शिंदे यांनी घेतलेला आहे. अठरा-अठरा तास काम करणार मुख्यमंत्री आपण पाहतो आहोत, यापुर्वीच्या इतिहासत राज्याने असा मुख्यमंत्री कधी पाहिला नाही. हा एक रेकार्ड असल्याचेही डॉ. शिंदे म्हणाले.

शेतकर्यांसाठी विविध योजना महायुती सरकारने राबविलेल्या आहेत. शेतकर्यांसाठी साडेसात एचपीपर्यंतची वीज माफी या सरकारने दिली आहे. त्यांना आता शुन्य वीजबिल येणार आहे. यापुर्वी असे कधीही घडलेले नाही. त्याच बरोबर कृषि पंप सोलार योजना आहे, समृद्धी महामार्गाच्या माध्यमातून शेतकर्यांना या सरकारने करोडपती केले आहे. राज्यातील एक गाव तर फॉच्युनर नावाचे प्रसिद्ध झाले असल्याचेही डॉ. शिंदे यांनी सांगितले हे सरकार देणारे सरकार आहे घेणारे नाही. सर्व समाज घटकासाठी या सरकारने काम केले आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांचे हात बळकट करण्यासाठी महायुतीसोबत रहा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

जालन्यातील शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाचे श्रेय घेत असल्याबाबत श्री खोतकर यांनी त्यांच्या भाषणातून डॉ. शिंदे यांना स्पष्टीकरण देण्याचे आवाहन केले होते यावरही डॉ. शिंदे यांनी आ. कैलास गोरंट्याल यांच्यावरही टिका केली. डॉ. शिंदे म्हणाले की, केंद्रात आपले सरकार आहे, राज्यात आपले सरकार आहे. तर वैद्यकिय महाविद्यालय कुणी आणले हे सगळ्याला माहित आहे.या वैद्यकिय महाविद्यालयासाठी माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी पाठपुराव केला असल्याचा दावा देखील डॉ. श्रीकांत शिंदे यांनी जाहीर सभेत केला आहे. यावेळी माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी राज्य सरकारने केलेल्या विकास कामांचा पाढा वाचला. लाडकी बहिण योजना, लेक लाडकी, युवकांसाठीच्या योजना, शेतकर्यांसाठीच्या योजनाबद्दल श्री खोतकर यांनी सांगितले. त्याचवेळी जालना शहरातील समस्यांकडेही त्यांनी डॉ. शिंदे यांचे लक्ष वेधले. वैद्यकिय महाविद्यालयाचे येथे श्रेय भलतेच लोकं घेताहेत म्हणत आ. गोरंट्याल यांच्यावर टीका करत श्री खोतकर यांनी डॉ. शिंदे यांना वैद्यकीय महाविद्यालय कोणी मंजुर केले कोणी आणले हे आपणच जनतेसमोर स्पष्ट करा असे आवाहन यावेळी केले. जालन्यातील वक्फ बोर्डचा मुद्दा, जालनेकरांना सध्याही आठ दिवसाआड पाणी मिळते म्हणत पिण्याच्या पाण्याची समस्याही त्यांनी मांडली. शंभर कोटींची सोलार योजना जालनेकरांसाठी मंजुर करुन द्यावी अशी मागणी त्यांनी यावेळी डॉ. शिंदे यांच्याकडे केली

पान ६ वरून...

## अर्धमसला, मुधापुरी, खांडवी

सागडे, चंद्रकांत मुळक या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या असंख्य कार्यकर्त्यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित व विजयसिंह पंडित यांना सोडचिट्टी देऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. सर्वांचे गळ्यात भगवे रुमाल घालून बदामराव पंडित यांनी स्वागत केले. याप्रसंगी जिल्हा परिषद चे माजी अर्थ आणि बांधकाम सभापती युधाजित पंडित, शिवसेना उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, शिवसेना तालुकाप्रमुख अजय दाभाडे, माजी उपनगराध्यक्ष अमोल करांडे, युवा सेना उपजिल्हाप्रमुख शेख सिराज, शेख नूरभाई, फैजल चाऊस, विश्वनाथ बोडखे, गंगाधर निकम, संतोष हिंगे, बंडू नांद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना बदामराव पंडित म्हणाले की, गेल्या ३० वर्षापासून मी तालुक्यातील गोरगरीब जनतेची प्रामाणिकपणे सेवा केली आहे. आजपर्यंत मी प्रत्येकाचे काही ना काही काम केलेले आहे. ज्यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांसह सामान्य जनतेचे नुकसान केले ते माझ्यासोबत एका पक्षात आल्याने मायबाप जनतेने माझी चूक नसतानाही मला पराभूत केले. आज त्यांच्याच विरोधात आपण लढणार असल्याने, आता जनता त्यांना जागा दाखवील अशी मला अपेक्षा आहे. गेल्या दहा वर्षापासून सामान्यांच्या सुखदुःखात सहभागी होणार दुसरा नेता नसल्याने जनता हैराण झालेली आहे. त्यामुळे प्रत्येक गावातील राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपचे असंख्य कार्यकर्ते दररोज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करत आहेत. महागाई, बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. त्यातच सरकार कडून शेतकरी, कष्टकरी आणि गोरगरिबांची फसवणूक झाल्याने जनतेने महायुतीला सत्तेतून बाहेर काढण्याचा निर्णय घेतला आहे. येणारा काळ आपलाच असून गेवराई विधानसभा मतदारसंघावर पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचाच भगवा फडकेल असा विश्वासही बदामराव पंडित यांनी व्यक्त करून, शिवसेनेमध्ये प्रवेश केलेल्या प्रत्येक कार्यकर्त्याचा माझ्या जुन्या आणि एकनिष्ठ कार्यकर्त्यांप्रमाणेच मानसन्मान राखला जाईल अशीही ग्वाही दिली.

शेख नूर भाई, अजय दाभाडे, शेख सिराज यांची समायोजित भाषणे झाली.

याप्रसंगी गोरख हिंगे, रमेश राऊत, वसंत निकम, अभिषेक शिंदे, रसिदाली शेख, सिकंदर शेख, अफसर शेख, कालु भाई, वसंत तेलुरे, बाबा पटेल, शेख फिरोज, शेख हुजूर, मारुती गायकवाड, मौलाना शेख नजीर, रामजी थोपटे, प्रसाद पिंपळे, प्रसाद नांद्रे, त्रिंबक थोपटे, अमोल राऊत, विनोद भिंगारे, बंडू काष्टे, मारुती कादे, भागवत पिंपळे, नाना निकम, उत्तम भोले, अनिल भोले, मारुती थोरात, बाबासाहेब हिंगे, सिद्धेश्वर हिंगे, संजय हिंगे, गोरख हिंगे, सोनाजी वाघ, प्रवीण निकम, राजेंद्र जाधव आदींसह शिवसैनिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गेवराई तालुका परिवर्तन

मतदारसंघात जनतेच्या अर्थिक, सामाजिक विकासासाठी भावनिक अथवा दबावाखाली न येता गेवराई तालुक्यातील जनतेने संघटीत परिवर्तन घडवण्याचे आवाहन ॲड.संजय भाऊ काळे यांनी केले. गेवराई तालुका परिवर्तन संघ ९०% समाजकारण व १०% राजकारण करणारी सामाजिक संघटना असुन गेवराई मतदार संघात संपूर्ण परिवर्तन करण्यासाठी समिती स्थापन करू असे भाऊंनी सांगितले. गेवराई मतदारसंघात या विधानसभेत संपूर्ण परिवर्तन करण्याचा निर्णय घेवून सर्वांनी पुढे येण्याचे आवाहन या पत्रकातून केलं आहे.

## महाराष्ट्रातील उद्योग

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव ॲड रिजवान शेख,युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष ऋषिकेश दरेकर, राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष डॉ नदीम शेख, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष राहुल काकडे, अतुल शिंदे,भरत घोडके, शौकत पठाण,अविनाश तळेकर, भैरव चव्हाण,जिशान सय्यद,शरद आमटे,अरबाज कुरेशी,दत्तु कांबळे,लहू केरूकर,आजिम खान, सचिन पवार,मुजामिल शेख, अरबाज बेग, महम्मद शेख,लहू भवर,अतिक कुरेशी,राजु खेडकर, अस्लम मौगल,माऊली पठाडे,मुदसर सय्यद आदी सहभागी झाले होते.

## मोहन घोडके यांचे

येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. याप्रसंगी माजी मंत्री सुरेश धस यांनी त्यांच्या निवासस्थानी जात मोहन घोडके यांचे अंतिम दर्शन घेतले.अंत्यविधी समयी युवा नेते जयदत्त धस राजेंद्र धोंडे,भारत मुरकुटे, श्रीधरपंत सहस्त्रबुद्धे, खंडू जाधव,शैलेश सहस्रबुद्धे, दीपक

पान ६ वरून...

निकाळजे, अशोक मुळे, पी. वाय. काळे, माजी जि.प.शिक्षण सभापती नियामत बेग,सचिन लोखंडे, किशोर झरेकर,सुनील रेडेकर, महेश सावंत, रिजवान शेख, संदीप येवले, डॉ.जयेश हंबर्डे, ऍड.अविनाश निंबाळकर,इर्शान खान,राजू हंबर्डे,दुर्गेश कुलकर्णी,बाळासाहेब निंबाळकर,,अय्यज शेख,सतीश टाकले,बंडू धोंडे, कीशोर धोंडे, सुरेश वारुगुळे,अथर बेग, गणेश शिंदे, शरद भगत,विजय साठे, शहादेव नरवडे,सागर काकडे,संदिप येवले, समीर पठाण,पत्रकार संघटनेचे अध्यक्ष प्रवीण पोकळे आष्टी तालुका फोटोग्राफर संघटनेचे अध्यक्ष सचिन रानडे,गणेश काकडे,मधुकर नवसुपे,शीतल मुथा आदी राजकीय,सामाजिक,व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.मोहन घोडके यांच्या पश्चात बाळासाहेब,विनोद,सतीश व आदेश घोडके ही चार मुले,सुना नातवंड असा परिवार आहे.

## आ.लोणीकरांचे हस्ते निराधार

आमदार बबनराव लोणीकर यांनी आज केले

सेवली येथे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते संजय गांधी निराधार योजना श्रावण बाळ योजना इंदिरा गांधी वृद्धापकाळ योजना परित्यक्ता विधवा दुर्धर आजाराग्रस्त अशा ४४० लाभार्थ्यांना मंजूर या देशाचे वाटप करण्यात आले त्याचप्रमाणे प्रधानमंत्री आवास योजना मोदी आवास योजना यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना रमाई घरकुल योजना शबरी घरकुल योजना अशा विविध घरकुल योजनांच्या माध्यमातून १००६ लाभार्थ्यांना मंजूर आदेशाचे वाटप करण्यात आले त्याचप्रमाणे एकात्मिक कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी १५० पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना चार्जिंग फवाऱ्याचे वाटप करण्यात आले. राज्यभरात बांधकाम कामगारांच्या बाबतीत अत्यंत संवेदनशील असलेल्या राज्य सरकारने विविध योजना सुरू केलेले आहेत त्या योजनांचा लाभ मिळावा यासाठी थंब सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे बांधकाम कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी राज्य सरकार सातत्याने प्रयत्न करत असून ज्या हाल अपेष्टा बांधकाम कामगारांनी आयुष्यभर सहन केल्या आहेत त्या पुढील काळात त्यांच्या मुलाबाळांना सहन करण्याची गरज पडू नये यासाठी बांधकाम कामगारांच्या मुला मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी राज्य सरकारने उचलली आहे बांधकाम कामगारांच्या मुला मुलींना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी राज्य सरकारचा कायम पुढाकार राहिला आहे असेही यावेळी श्री लोणीकर यांनी स्पष्ट केले

कुठलेही योजना मंजूर करायची असेल तर त्यासाठी दलालांचा कायम सुळसुळाट झालेला दिसून येतो परंतु आपल्या विधानसभा मतदारसंघात कुठलीही योजना मंजूर करून घेण्यासाठी कुठल्याही दलालाचा आमिषाला गोळी करू नये आणि कुणी त्या संदर्भाने सर्वसामान्यांची फसवणूक करत असेल किंवा एखादी योजना मंजूर करून देण्यासाठी पैशाची मागणी करत असेल तर अशा लोकांच्या आमिषाला बळी न पडता थेट पोलिसात किंवा थेट माझ्याकडे तक्रार करा असे आवाहन देखील यावेळी लोणीकरांनी केले. यावेळी तहसीलदार छाया पवार गटविकास अधिकारी श्री सूर्यवंशी तालुका कृषी अधिकारी यांच्यासह लोकप्रतिनिधी पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोरे यांनी केले तर तहसीलदार छाया पवार गटविकास अधिकारी श्री सूर्यवंशी व तालुका कृषी अधिकारी श्री राठोड यांनी आपापल्या विभागा अंतर्गत विविध योजनांची सविस्तर माहिती दिली.

## एससी एसटी आरक्षण उपवर्गीकरण

खंडपीठाने ६/१ एस.सी,एस.टी उपवर्गीकरण व क्रिमिलिअर अटीचा निर्णय दिला परंतु संविधानात तशी तरतूद नसताना घेतला आहे तो निर्णय एससी. एसटी जातीच्या समुहसूचीला विभागून आपआपसात विभागणी करून मोठ्या प्रमाणात वाद निर्माण करण्यास प्रवर्त करत आहे .तसेच एस सी ,एस टी जातीच्या समूहसूचीतील वर्गाने उपवर्गीकरण व क्रीमिलिअर अटीची मागणी या जातीने कधीच केली नसताना तो निर्णय सर्वोच्च न्यायालयाने पारित केला.आहे तो निर्णय तात्काळ रद्द व्हावा अन्यथा यापेक्षाही मोठ्या संख्येने उग्र आंदोलन करण्यात येईल व याचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्र राज्यात पडतील याची शासनाने नोंद घ्यावी.अश्या मागण्याचे निवेदन सकल बौद्ध समाजाच्या वतीने तहसीलदार यांना देण्यात आले आहे.यावेळी हजारो बौद्ध समाज बांधव या मोर्चामध्ये सहभागी झाले होते.

पान १ वरून...

## धनगर एसटी आरक्षणाचा जीआर

मंगळवारी दुपारी आक्रमक झाला. आरक्षणाच्या मागणीसाठी धनगर समाजाचे काही कार्यकर्ते मंत्रालयात आले. यावेळी त्यांनी आक्रमक पवित्रा घेत थेट मंत्रालयाच्या सुरक्षा जाळीवर उड्या मारल्या. त्यानंतर गोंधळ निर्माण झाला होता. यावेळी पोलिसांनी धावपळ करत आंदोलकांना जाळीवरुन काढले. मंत्रालयाच्या प्रत्येक माळ्यावर आंदोलकांना बघण्यासाठी गर्दी झाली होती. त्यानंतर आंदोलकांनी आपल्या आरक्षणासंबंधीच्या मागण्या सरकारसमोर मांडल्या.

## गोशाळांच्या अनुदानाला

वा ओझी वाहण्यासाठी वा पैदाशीसाठी उपयुक्त नसलेली गोवंशीय बैल व वळू यांच्या कत्तलीवर बंदी घालण्यात आलेली आहे. त्यामुळे भाकड जनावरांची संख्या वाढत आहे. त्यांचं संगोपन करणं पशूपालकांना परवडत नाही. त्यामुळे मोकाट वा गोशाळेत जनावरे पाठवली जातात. त्याचा गोशाळांना आर्थिक भार पडत असल्यानं राज्य सरकारने देशी वंशाच्या गोधनाचे जतन आणि संगोपन करणाऱ्या गोशाळा, गोसदन, पांजरपोळ गोरक्षण संस्थांना बळकट करण्यासाठी आर्थिक अनुदान देण्यासाठी ३० सप्टेंबर रोजी मंत्रिमंडळ मान्यता दिली होती. या योजनेची अंमलबजावणी गोसेवा आयोगामार्फत करण्यात येणार आहे. त्यासाठी आयोग ऑनलाईन अर्ज मागवणार आहे. त्यामुळे या निर्णयाचा शेतकऱ्यांऐवजी गोशाळा, पांजरपोळ यांना फायदा होणार आहे.

## मच्छिंद्रनाथ गडाप्रमाणे,रेणूकाई

प्रतिपादन माजीमंत्री सुरेश धस यांनी केले.

आष्टी तालुक्यातील बेलगांव येथे १२ कोटी विकासकामांचा शुभारंभ सोमवार (दि.७)रोजी सकाळी १० वा.माजीमंत्री सुरेश धस यांच्याहस्ते करण्यात आले.यावेळी ते बोलत होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड.साहेबराव म्हस्के, रावसाहेब पोकळे,नगराध्यक्ष जिया बेग, कल्याण पोकळे,सरपंच प्रविण वारे,किरण पोकळे,खंडु जाधव, आत्माराम फुंदे यांच्यासह आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.पुढे बोलतांना धस म्हणाले,रेणुकामाता मंदिरास ४ कोटी,बेळगांव ते मांडवा रस्ता ३ कोटी व जलजीवन काम असे एकूण बारा कोटी रूपायांची कामे येथे मंजूर केले आहेत.जलजीवन योजना ही देशाचे पंतप्रधान यांनी लक्ष घालून देशातील प्रत्येक गावात जल और नल ची योजना प्रभावीपणे राबवली आहे.सार्वजनिक कामे कसे करायची याचे उत्तम उदाहरण पाहायचे असेल तर आपल्या मतदारसंघातील कुसूळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्र पाहा मग कळेल की,काम कसे असावे. बेलगांवचे सरपंच प्रविण वारे म्हणाले, आत्तापर्यंत बेलगांवला एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी कोणीच दिला नाही.मात्र,धस आण्णांनी आपल्या गावाला एकाचवेळी १२ कोटी निधी देणारा एकमेव नेता ठरला आहे.आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर विकास कामे करून गावचा कायापालट करणार असल्याचे वारे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अमृत पोकळे यांनी केले तर आभार शिंदे मामा यांनी मानले.

## एसटीची एक महिन्यासाठी

महागणार आहे. दिवाळीच्या सुट्यांमध्ये अनेक कुटुंबे गावी, पर्यटनस्थळांना भेटी देण्याचे बेत आमजतात. दिवाळीला जोडून आलेल्या सुट्टयांमुळे होणारी गर्दी लक्षात घेऊन महामंडळ दरवर्षी जादा गाड्यांची घोषणा करते. दिवाळी आणि उन्हाळी हंगामातील गर्दीतून उत्पन्न वाढीसाठी महामंडळ दरवर्षी हंगामी भाडेवाढ करते, महामंडळाच्या धोरणानुसार गर्दीच्या हंगामात भाडेवाढ करण्याचा अधिकार राज्य परिवहन गर्दीतून उत्पन्न वाढीसाठी महामंडळ दरवर्षी हंगामी भाडेवाढ करते, महामंडळाच्या धोरणानुसार गर्दीच्या हंगामात भाडेवाढ स्वस्पाची भाडेवाढ केली जाते.

## केजवासीयांचे स्वप्न पूर्ण

पायाभरणी व तालुका क्रीडा संकुलाचे भूमिपूजन आ. नमिता मुंदडा यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केज विधानसभेचे प्रभारी झारखंडचे आ. श्रवण रनखांब, जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा, सुनील गलांडे, नेताजी शिंदे, दिलीप भिसे, शंकर उबाळे, वसंत केदार, डॉ. वसुदेव नेहरकर, महादेव सूर्यवंशी,

पान १ वरून...

भगवान केदार, महादु मस्के, मुरली ढाकणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना आ. नमिता मुंदडा म्हणाल्या की, महायुतीचे सरकार आल्यानंतर माजी मंत्री आ. पंकजा मुंडे व माजी खा. प्रीतम मुंडे यांच्या नेतृत्वाखाली मतदार संघातील विविध विकास कामासाठी तब्बल दोन हजार कोटी रुपयांचा निधी आणल्याचे सांगून केज शहरातील रस्त्यासाठी ११० कोटी रुपयांचा निधी दिला असून दोन गार्डनसाठी प्रत्येकी १८ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. भवानी माता मंदिर व दर्ग्यासाठी प्रत्येकी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर केल्याचे सांगून या सर्व विकास कामातून केजचा चेहरा बदलणार असल्याचे त्या म्हणाल्या.

गायरान जमिनीतील घरांना धक्का बसणार नाही

पिसेगाव येथील गायरान जमिनीत तालुका क्रीडा संकुलाचे काम होत असून याठिकाणी वास्तव्यास असलेल्या लोकांनी आमची पर्यायी व्यवस्था करून घरकुल बांधून द्यावीत अशी मागणी भूमिपूजन प्रसंगी केली. यावेळी पर्यायी जागा उपलब्ध करून घरकुल बांधून देण्यात येईल. तोपर्यंत बांधलेल्या घरांना धक्का लावला जाणार नाही. अशी ग्वाही आ. नमिता मुंदडा व तहसीलदार राकेश गिड्डे यांनी दिली. यावेळी बोलताना नंदकिशोर मुंदडा म्हणाले कि ; स्व विमलताईंनी मतदार संघात काम करत असताना कधीही जात बघितली नाही त्यांच्या विचारांचा हाच वारसा आम्ही पुढी चालवत आहोत . मतदार संघात विकासाचे एकही काम न आणणारे आमच्या काळात विकास झाला नाही असे म्हणतात अशी उपरोधिक टीका कोणाचेही नाव न घेता करत विकासाच्या मुद्यावर चर्चा करण्यासाठी खुल्या मंचावर समोरासमोर यावे असे आव्हान विरोधकांना त्यांनी दिले . तसेच राजकारणात पन्नास मार्क हे विकासाला , पंचेवीस मार्क चारित्र्याला तर उर्वरित पंचेवीस मार्क सुख - दुःखात सामील होण्याला असतात तरच शंभर मार्कांची बेरीज करून यश मिळवता येते असे सांगत काहींचे कान देखील त्यांनी टोचले . तसेच मतदार संघातील प्रत्येक गावात विकासाची कामे झाली असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले . तसेच केज शहरासाठी शंभर कोटींची नळयोजना देखील मंजुरीच्या अंतिम टप्यात असल्याची माहिती सांगत विकासासाठी आम्ही सदैव कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार देखील त्यांनी यावेळी केला

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ वसुदेव नेहरकर यांनी केले तर प्रास्ताविक महादेव सूर्यवंशी यांनी केले तर कार्यक्रमास शहर व तालुक्यातील कलावंत व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती

## वृद्धांची आणि महिलांची

ही बाब लक्षात घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी मंगळवारी बँक अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले. तत्काळ प्रशासन सुरळीत न केल्यास पक्षाच्या वतीने हजारो महिलांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन करू असा इशारा दिला आहे.

याबाबत सविस्तर असे की, लाडकी बहिण योजना, श्रावणबाळ तसेच संजय गांधी निराधार योजनांचे पैसे बँक खात्यावर जमा झालेले आहेत. मात्र केवायसीची अट असल्याने केवायसी करण्यासाठी बँकांच्या दारात हजारोंची गर्दी होत आहे. शेकडो महिलांना उन्हातान्हात तसेच रात्री अपरात्री ताटकळत रांगेत उभे राहावे लागत आहे. त्यातील काही महिलांना आणि खतेधारकांना बीपी, शुगर सारखे अनेक गंभीर स्वरूपाचे आजार असतात. अशा परिस्थितीत त्यांना आरोग्याच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागू शकते. झालेच तर रांगेत उभे राहण्यासाठी वाद होत आहेत, मोठ्या प्रमाणावर गर्दी जमत असल्याने चोऱ्यामाऱ्या व अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे महिलांची आणि वृद्धांची हेळसांड होत आहे. हे प्रकार वेळीच थांबवा अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने हजारो महिलांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन करण्यात येईल, याची संपूर्णतः जबाबदारी बँकांवर असेल असा इशारा राजेभाऊ फड यांनी दिला आहे.

केवायसी काऊंटर वाढवा

बँक खात्याची केवायसी करण्यासाठी दररोज बँकेच्या दारात हजारोंच्या संख्येने लोक जमत आहेत. त्यात मुलेबाळे घेऊन आलेल्या महिला व वृद्धांची हेळसांड होत आहे. ते थांबवण्यासाठी बँकांनी केवायसी काऊंटर वाढवून प्रशासन सुरळीत करावे अशी मागणी सर्व बँकांना दिलेल्या पत्राच्या माध्यमातून राजेभाऊ फड यांनी केली आहे. मागणी पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला.

cmyk

## राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचा बीड दौरा कार्यक्रम

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन हे बुधवार, दि.९ ऑक्टोबर २०२४ रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत त्यांच्या दौऱ्याचा तपशील खालील प्रमाणे आहे. बुधवार दि. ९ ऑक्टोंबर २०२४ रोजी छत्रपती संभाजीनगर येथून सकाळी ९.५५ वाजता शासकीय हेलीकॅप्टरने बीडकडे प्रयाण. सकाळी १०.३० वाजता बीड यथील पोलीस ग्राऊंडवर आगमन १०.३५ वाजता बीड येथील शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण. सकाळी १०.४५ वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत विविध क्षेत्रातील व्यक्तींशी ते संवाद साधतील. दुपारी १.०० ते २.०० वाजेपर्यंत राखीव. दुपारी २.०० वाजून १० मिनिटांनी शासकीय विश्रामगृह, बीड येथून पोलीस ग्राऊंडकडे प्रयाण. दुपारी २.१५ वाजता शासकीय हेलीकॉप्टरने ते जालनाकडे प्रयाण करतील.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि.९ ऑक्टोबर २०२४



# शैलेश आंधळे यांचा एमपीएससीत यश संपादन केल्याबद्दल सन्मान

## जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा मान्यवरांनी केला सत्कार

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील,महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी चि.शैलेश भिकाराम आंधळे यांनी २०२३ च्या एमपीएससी परीक्षेत राज्यातून ४४ वा क्रमांक पटकावून क्लास वन अधिकारी पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा आई-वडिलांसह सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम सोमवार दि.०७ ऑक्टोबर २०२४ रोजी विद्यालयांमध्ये आयोजित करण्यात आला.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणी नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे तर कार्यक्रमाच्या सत्कारमूर्ती चि.शैलेश आंधळे,वडील श्री.भिकम शेठ आंधळे,आई सौ.राधाताई आंधळे व प्रमुख अतिथी म्हणून रुई गावचे सरपंच शंकररावजी आंधळे तसेच शालेय समितीचे अध्यक्ष तथा युवा नेते संजय भाऊ आंधळे,वडवणी कृ.उ.बा.समितीचे उपसभापती अनिल दादा चोले,मा.नगरसेवक सतीष बप्पा बडे,संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे, वडवणी मार्केट कमिटीचे संचालक तथा उद्योजक रजीत भैय्या धस,पत्रकार ॲड.जानकीराम उजगरे,पत्रकार अविनाश मुजमुले,विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम आदी मान्यवर म्हणून उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सत्कारमूर्ती चि.शैलेश आंधळे,वडील श्री.भिकम शेठ आंधळे,आई सौ.राधाताई आंधळे यांचा विद्यालयाचे प्राचार्य,उपप्राचार्य,पर्यवेक्षक, शिक्षक-शिक्षिका,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी फेटा बांधून हार,शाल,बुके देऊन,पेढा भरून विद्यालयाच्या वतीने सहृदय सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना चि. शैलेश आंधळे म्हणाले की,ज्या शाळेत तुम्ही शकतात त्याच महाराणी ताराबाई शाळेमध्ये मी शिक्षण घेतले आठ-आठ,नऊ- नऊ तास मी अभ्यास केला मोबाईल पासून मी दूर राहिलो तुम्ही पण कामापुरता मोबाईलचा उपयोग करा युट्युब,फेसबुक,इंस्टाग्राम यापासून दूर राहा,शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये भाग घ्या त्याचा तुम्हाला पुढे चालून फायदा होईल असे विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील चि.अभिषेक भुजबळ १५०० मीटर धावण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांक तर कु.अंजली चव्हाण हीचा भालाफेक मध्ये प्रथम क्रमांक तसेच कु.शुभांगी लोकरे भालाफेक मध्ये द्वितीय क्रमांक व अडथळा शर्यती मध्ये कु.पूजा यादव हीचा तृतीय क्रमांक जिल्ह्यातून आल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते हार,बुके देऊन त्यांचे स्वागत करून अभिनंदन केले व विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप पर विचार व्यक्त करताना उपनगराध्यक्ष बन्शी भाऊ मुंडे म्हणाले की,माजी आमदार केशवदादा आंधळे यांनी डोंगरपट्ट्यातील मुला-मुलींना शिक्षण घेता यावा म्हणून ही शाळा सुरू केली या शाळेचा माजी विद्यार्थी चि.शैलेश आंधळे एमपीएससी परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन करून स्वतःचं,आई-वडिलांच आणि शाळेचे नाव रोशन केले तसेच तुम्ही पण करावे असे बोलून शैलेश आंधळे व त्यांच्या आई-वडीलांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन श्री.विष्णू आंधळे यांनी केले तर उपस्थितांचे आभार श्रीमती शोभाताई आंधळे मॅडम यांनी मानुन शैलेश यांच्यावर कविता म्हणून कार्यक्रमाची सांगता केली. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## धारूर तहसील कार्यालयासमोर किसान सभेच्या कार्यकर्त्यांची निदर्शने



धारूर । प्रतिनिधी

अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने शेतकऱ्याच्या प्रश्नावर तेलगाव या ठिकाणी बेमुदत धरणे आंदोलन सुरू आहे त्यांना पाठींबा म्हणून तहसील समोर किसानसभेच्या वतीने तीव्र निदर्शने करण्यात आले आहेत. तहसीलदारला निवेदन देण्यात आले.

अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने ९ सप्टेंबर ते १२ सप्टेंबर २०२४ दरम्यान बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर बेमुदत धरणे आंदोलन करून पिक विमा कर्ज तसेच विविध अनुदाने आणि पीक विमा वाटप केलेल्या याद्या व शेतकऱ्यांची माहिती शासनाने व विना विमा कंपनीने द्यावी या संदर्भात आवाज उठविण्यासाठी बेमुदत धरणे आंदोलन केले होते त्यावेळी किसान सभेने केलेल्या मागण्या ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत मान्य करण्यात येतील असे आश्वासन प्रशासनाच्या वतीने देण्यात आले होते परंतु ३० तारखेपर्यंत शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार कोणतीही कार्यवाही केली नाही त्यामुळे अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने हनुमान मंदिर तेलगाव तालुका धारूर येथे पुन्हा बेमुदत धरणे आंदोलन चालू केलेले असून चार ऑक्टोबर पासून ते मुदत जोपर्यंत शासन मागण्या पूर्ण करीत नाही तोपर्यंत धरणे आंदोलन करण्याचा निर्णय किसान सभा व जिल्ह्यातील शेतकरी यांनी केलेला असून शेतकऱ्यांच्या मागण्या शासनाच्या वतीने लवकरात लवकर मान्य करावेत अन्यथा आंदोलन केले जाईल शेतकऱ्यांच्या बेमुदत धरणे आंदोलनाविषयी सरकारला काहीही गांभीर्य नाही त्यामुळे शासनाला जाग आणण्यासाठी आंदोलनाचा एक भाग म्हणून अखिल भारतीय किसान सभा कमिटी धारूर यांचे मग़ळवारी तहसील कार्यालय धारूर येथे निदर्शने करण्यात आले व शासनाने शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या लवकरात लवकर पूर्ण कराव्यात म्हणून घोषणाबाजी करण्यात आलीतहसीलदारला निवेदन देण्यात आले कार्यकर्ते मोठ्या सख्येने उपस्थीत होते

# मुद्रांक विक्रेत्यांकडून होतेय जनतेची आर्थिक लूट

## उपविभागीय अधिकाऱ्यांना अखिल भारतीय मराठा महासंघाचे निवेदन



अंबाजोगाई । प्रतिनिधी

मुद्रांक विक्रेत्यांकडून सर्वसामान्य जनतेची होणारी आर्थिक लूट तात्काळ थांबवा अशी मागणी जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण यांनी केली आहे. याप्रश्नी लक्ष वेधून घेत उपविभागीय अधिकाऱ्यांना अखिल भारतीय मराठा महासंघाचे वतीने सोमवारी निवेदन देण्यात आले.

याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण म्हणाले आम्ही सोमवार, दिनांक ७ ऑक्टोबर रोजी उपविभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून एका महत्त्वाच्या विषयाकडे लक्ष वेधून घेतले आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, मुद्रांक (बॉण्ड) विक्रेत्यांकडून सर्वसामान्य जनतेची आर्थिक लूट मोठ्या प्रमाणात होत आहे. शासनाने नुकतेच २०२४ मध्ये १००/- रूपयाचे मुद्रांक (बॉण्ड) बंद करून ५००/- रूपयांचे मुद्रांक (बॉण्ड) सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. खरे तर दैनंदिन जीवनामध्ये मुद्रांक (बॉण्ड) चा उपयोग हा न्यायालय, कचेरी, रजिस्ट्री ऑफिस, तहसील कार्यालय, शैक्षणिक कार्यपद्धती व वेगवेगळी शपथपत्रे तयार करण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात होतो. आजपर्यंत १०० चा मुद्रांक (बॉण्ड) विक्रेत्यांकडून हा नियमबाह्य पद्धतीने ११०/- रूपयाला विकला जात आहे. आता ५००/- रूपयांचा मुद्रांक (बॉण्ड) देखील ५५०/- रूपयाला नियमबाह्य पद्धतीने विकला जातोय, परिणामी एका मुद्रांकामागे शासन ४००/- रूपये तर मुद्रांक (बॉण्ड) विक्रेत्यांकडून अधिकचे ५०/- रूपये असे एकूण मिळून ४५०/- रूपये मोजावे लागणार आहेत. हि वाढ तब्बल पाचपट आहे.

मंत्रिमंडळाच्या या चुकीच्या निर्णयाचा फटका सर्वसामान्य माणसाला आर्थिक झळ स्वरूपात बसणार आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्यांची खूप मोठी आर्थिक लूट होत आहे. तरी राज्य सरकारने १००/- रूपयांचा बॉण्ड व ५००/- रूपयांचा बॉण्ड यांची अधिकृत जी किंमत असेल ती जाहीर करून बॉण्ड विक्रेत्यांना शासनमान्य दरानुसारच विकण्यास बंधनकारक करावे, अन्यथा जे बॉण्ड विक्रेते शासन निर्णयांची अंमलबजावणी करणार नाहीत, अशा बॉण्ड विक्रेत्यांचे परवाने रद्द करावेत व सर्वसामान्यांची होणारी आर्थिक लूट तात्काळ थांबवावी, तसेच सर्वसामान्य जनतेसाठी जाचक ठरणारा हा तुघलकी निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा अशी विनंती ही सदरील निवेदनातून करण्यात आली आहे.

सदरील निवेदनावर अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष राणा चव्हाण, लहुजी शिंदे, पांडुरंग देशमुख, विजय चव्हाण, ओम चव्हाण, शेख अकबर, सुधार उफाडे, दादाहरी केकाण यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जीवनशैलीत बदल केल्यास हृदयरोग टाळता येतो - डॉ.शिवपुजे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दैनंदिन जीवन शैलीत बदल केल्यास हृदयरोग टाळता येवू शकतो. मात्र यासाठी स्वतःमध्ये बदल करून आहार-विहार व व्यायाम दैनंदिन गरजेचा आहे. असे प्रतिपादन लातूर येथील प्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ.संजयकुमार शिवपुजे यांनी केले.



येथील घुगे हार्ट ॲण्ड क्रिटीकल केअर हॉस्पिटल, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व इंडियन मेडीकल असोसिएशन यांच्या वतीने जागतीक हृदयदिन व घुगे हॉस्पिटलच्या वर्धापन दिनानिमित्त रविवारी सायंकाळी आद्यकवी मुकुंदराज सभागृहात संवाद हृदयरोगाशी व सी.पी.आर.प्रात्याक्षिक या उपक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.संजयकुमार शिवपुजे बोलत होते. या उपक्रमासाठी मुंबई येथील सी.पी.आर.तज्ञ डॉ.ऐश्वर्या लाहोटी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लबचे रोगप्रतिबंधक आणि उपचार सल्लागार हरिष मोटवाणी होते. तर व्यसापीठावर आ.नमिता मुंदडा, माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, संयोजक डॉ.नवनाथ घुगे, रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी यांची उपस्थित होती.यावेळी बोलताना डॉ.संजय शिवपुजे म्हणाले की, सध्याच्या धावपळीच्या जीवनात माणसाचे संपुर्ण जीवनशैली चुकीच्या पद्धतीने सुरू आहे. विनाकारण निर्माण होणारे ताणतणाव, वाढती व्यसनाधिनता, धुम्रपान यामुळे कमी वयात हृदयरोग बळावू लागला आहे. देशात ३३ टक्के मृत्यू केवळ हृदयविकाराच्या झटक्यामुळे होतात. हे प्रमाण जीवनशैलीत बदल केल्यास निश्चित परिवर्तीत करता येते. मात्र त्यासाठी दैनंदिन व्यायाम, योग्य आहार, योगासने, आवाड जोपासणे अशा विविध माध्यमातून मन व शरिर निरोगी राहिल्यास हृदयरोग टाळता येतो. यावेळी त्यांनी चित्रफितीच्या माध्यमातून उपस्थितांना हृदयरोगाच्या संदर्भातून सविस्तर माहिती विषद केली. यावेळी अध्यक्षसीय समारोप हरिष मोटवाणी यांनी केला. तर आ.नमिता मुंदडा, राजकिशोर मोदी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. दिपप्रजवलन व धन्वंतरी पुजनाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.नवनाथ घुगे यांनी केले. तर संचलन प्रा.रमेश सोनवळकर यांनी तर उपस्थितांचे आभार धनराज सोळंकी यांनी मानले. या कार्यक्रमास महिला व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थितीत होती.हृदयरोगाचा झटका आल्यानंतर बेशुद्ध होवून पडलेल्या व्यक्तीला सी.पी.आर.हा प्रथमोपचार कोणीही देवू शकतो. जोपर्यंत रूग्णवाहिका येत नाही. अथवा रूग्णालयात त्या व्यक्तीला नेईपर्यंत त्या रूग्णाला सी.पी.आर.दिला तर त्याला जीवदान मिळू शकते. अशा सी.पी.आर.च्या माध्यमातून अनेक रूग्णांना जीवदान मिळालेले आहे. या सी.पी.आर.चे प्रात्याक्षिक उपस्थितांना डॉ.ऐश्वर्या लाहोटी यांनी दिले.

## ब्रह्माकुमारीज येथे नवरात्रीनिमित्त योग धारणा पावन पर्वास प्रारंभ

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील ब्रह्माकुमारीज आनंदसरोवर, अंबाजोगाई ओम शांती सेंटर येथे नवरात्री (दसरा) निमित्त योग धारणा पावन पर्वास प्रारंभ झाला आहे. नवरात्री पावन पर्वात दररोज सकाळी सव्वा सहा ते सव्वा सात या वेळेत साधकांच्या वतीने सेंटरमध्ये घटस्थापना करून विविध देवींची आराधना व योग धारणा करण्यात येत आहे.

याचा प्रारंभ याचा प्रारंभ दिनांक ३ ऑक्टोबर रोजी बीके राजू भाई व बीके उर्मिला माता यांनी केला. दिनांक ४ ऑक्टोबरला बीके कदम भाई व बीके सुमित्रा माता तसेच ५ ऑक्टोबरला बीके रमेशभाई व बीके उर्मिला माता, बीके राजेंद्र रापतवार, प्रणिता माता, मुळे माता यांनी योग धारणा केली. पुढील पर्वामध्ये बीके श्रीकिशन भाई, बिके सुभाषभाई, बिके काळदाते भाई, बिके करवा माता व इतर माता आणि भाई हे सहभाग घेणार आहेत. सदरील पावन पर्वास ओमशांती सेंटरच्या संचालिका बिके सुनीता बहेन, बिके मंजू बहेन, बीके प्रिया बहेन यांनी सर्व साधकांना प्रेरणा दिली. देवीच्या अष्टशक्ती, सहन करणे की शक्ती, सामना करने की शक्ती और परखने की शक्ती इत्यादी आपल्या जीवनात धारण करून सुखी, समाधानी, आनंदी जीवन सर्वांनी जगावे असा मौलिक संदेश दिला. जीवन आनंददायी व निर्विघ्न करण्यासाठी मन शांत असणे गरजेचे आहे. म्हणून चिंतन योगधरणा करणे अत्यंत महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन ही केले. तसेच नेहमी सकारात्मक व्हायब्रेशन इतरांना द्यावेत ज्यामुळे वाईट प्रवृत्तीचा नाश होऊन त्यांच्या अंगी चांगले गुण येतील. प्रत्येक व्यक्तीने १६ कला धारण कराव्यात, कुणालाही त्रास देऊ नये, निसर्गनियम पाळावेत, दैवी गुण धारण करावेत, चांगले कर्म करावेत, परमात्म्याने सांगितल्याप्रमाणे वर्तन करावे इत्यादी मौलिक विचार या पर्वाच्या निमित्ताने मांडले. या प्रसंगी मोठ्या संख्येने बीके भाई व बीके माता यांची उपस्थिती होती. पुढील काळात समाजातील विविध घटकांना सोबत घेऊन दीपावली पावन पर्वाच्या निमित्ताने स्नेह मिलन घ्यावे ज्यामध्ये डॉक्टर्स, इंजिनियर, पत्रकार, व्यापारी, शेतकरी, समाजसेवक, वकील, अधिकारी, कष्टकरी या घटकांना निमंत्रित करण्याचा मनोदय अंबाजोगाई केंद्र संचालिका बिके सुनीता बहेनजी यांनी व्यक्त केला.

# डॉ.अंजलीताई घाडगे यांनी जनसंपर्क दौऱ्यातून साधला संवाद

## शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, श्रमजीवी, कामगार यांचे घेतले आशिर्वाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या डॉ.अंजलीताई घाडगे यांनी केज मतदारसंघ मागील काही दिवसांपासून पिंजून काढला आहे. जनसंपर्क दौऱ्यातून त्यांनी शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, श्रमजीवी, कामगार, व्यापारी, विद्यार्थी, महिला यांच्याशी संपर्क करून संवाद साधला आशीर्वाद घेतले.





केज विधानसभा मतदारसंघातील जनसंपर्क दौऱ्यानिमित्त डॉ.अंजलीताई घाडगे यांनी 'आधार मल्टीस्टेटच्या अंबाजोगाई' येथील कार्यालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी बँकेचे व्यवस्थापक यांनी ताईंचा सत्कार केला आणि आपल्या बँकेविषयी तसेच बँक मधील कर्मचारी आणि व्यवस्थापन तसेच कामकाज याविषयी माहिती दिली. तसेच बँकेच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी बँकेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते. तसेच अंबाजोगाई येथील आराध्या मोबाईल्स एँड ॲक्सेसरीज, तथागत चौक या दुकानाच्या उद्घाटन प्रसंगी भेट देऊन प्रोप्रा.अजय गोविंद जामदार यांना व्यवसायातील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या ठिकाणी बोलत असताना आजच्या युवकांनी उद्योग आणि व्यवसाय यावर लक्ष केंद्रित करून आपल्या कुटुंबाचे, आपल्या गावाचे आणि अप्रत्यक्षरीत्या आपल्या देशाचा विकास साधावा असे प्रतिपादन डॉ.घाडगे यांनी केले. तर केज मतदारसंघातील भाटुंबा येथे कै.भीमराव शंकरराव धपाटे यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त ह.भ.प.श्री.सुरेश महाराज वारके यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम गावातील हनुमान मंदिर येथे आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी राष्ट्रवादी पक्ष (शरदचंद्र पवार) गटाच्या नेत्या डॉ.अंजलीताई घाडगे यांनी उपस्थित राहून श्री. शंकर धपाटे, गणेश धपाटे, मोहन धपाटे आणि परिवाराशी संवाद साधला. यावेळी गावातील नागरिक तसेच धपाटे परिवाराशी संबंधित नातेवाईक आणि मित्र, परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. जनसंपर्क दौऱ्यानिमित्त डॉ.अंजलीताई यांनी भिमाई नगर, अंबाजोगाई या ठिकाणी भेट दिली. या भागातील सध्याचे प्रश्न तसेच आरोग्यविषयक समस्यांविषयी स्थानिकांशी चर्चा केली आणि ते लवकरात लवकर सोडवू असे उपस्थितांना आश्वासन दिले. यावेळी या भागातील युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकूणच काय तर डॉ.अंजलीताई घाडगे यांनी केज मतदारसंघ मागील काही दिवसांपासून पिंजून काढला आहे. जनसंपर्क दौऱ्यातून त्यांनी शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, श्रमजीवी, कामगार, व्यापारी, विद्यार्थी, महिला यांच्याशी संपर्क करून त्यांचे प्रश्न, समस्या जाणून घेतल्या व सकारात्मक संवाद साधून ज्येष्ठांचे आशीर्वाद घेतले. एक विकासाभिमुख, आश्वासक चेहरा म्हणून केज विधानसभा मतदारसंघातील जनता डॉ.अंजलीताई घाडगे यांच्याकडे मोठ्या आशेने पाहत आहे

## स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात मतदान जनजागृती रॅली



अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचालित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात मतदान जनजागृती कार्यक्रम २०२४ निमित्त्याने रॅली काढण्यात आली रॅलीचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.आर. थारकर यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यां समवेत शहरातून मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. गटशिक्षणाधिकारी यांच्या आदेशानुसार आणि शिक्षण विस्तार अधिकारी मधुकर सुवर्णकार, नांदुरकर यांच्या मार्गदर्शनानुसार हे अभियान राबवण्यात येत आहे.

मतदान जनजागृती कार्यक्रमाच्या समन्वयक प्रा.सविता बुरांडे यांनी प्रास्तविक करून आभार मानले.यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.जितेंद्र देशपांडे,पर्यवेक्षक जवळगावकर, महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

cmyk

# कांद्याच्या भावात चढ उतार कायम

## कापूस, सोयाबीन, कांदा तसेच काय आहेत ज्वारीचे दर?




आंतरराष्ट्रीय बाजारात सोयाबीनच्या भावातील नरमाई घट कायम आहे. सोयाबीनसह सोयापेंडचे भाव कमी झाले. आज दुपारपर्यंत सोयाबीनचे वायदे काहीसे कमी होऊन १०.२३ डॉलर प्रतिबुशेल्सवर होते. तर सोयापेंडचे वायदे ३२३ डॉलर प्रतिबुशेल्सवर होते. देशातील बाजारातही सोयाबीनच्या भावात काहिशी नरमाई आली होती. बाजारात नव्या मालाची आवक सुरु झाल्याचा दबाव दरावर दिसून येत आहे. प्रक्रिया प्लांट्सनी आपले खरेदीचे भाव आज ४ हजार ५५० ते ४ हजार ६५० रुपयांच्या दरम्यान काढले होते. तर बाजार समित्यांमधील व्यवहार ४ हजार ते ४ हजार ५०० रुपयांनी झाले. सोयाबीनच्या भावातील चढ उतार कायम राहतील, असा अंदाज अभ्यासकांनी दिला.

कापसाच्या भावातील चढ उतार सुरुच आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारात आज भाव काहिसे कमी झाले होते तर देशातील बाजारात भाव स्थिर होते. आंतरराष्ट्रीय बाजारात आज दुपारपर्यंत कमी होऊन वायदे ७२.७२ सेंट प्रतिपाऊंडवर होते. तर देशातील वायदे ५६ हजार ५०० रुपये प्रतिखंडीवर होते. बाजार समित्यांमधील कापसाचा भाव मात्र टिकून आहेत. देशातील बाजार समित्यांमध्ये कापसाचे भाव ७ हजार ते ७ हजार ७०० रुपयांच्या दरम्यान आहेत. कापसाच्या भावातही चढ उतार कायम राहू शकतात, असा अंदाज कापूस बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.

कांद्याच्या भावातील चढ उतार कायम दिसून येत आहेत. वाढलेल्या भावात कांद्याला उठाव कमी दिसत आहे. तर भाव कमी झाल्यानंतर कांद्याची बाजारातील आवक कमी होत आहे. त्यामुळे कांद्याच्या भावात चढ उतार दिसत आहेत. कालच्या तुलनेत आज कांद्याच्या भावात काहिशी नरमाई आली होती. कांद्याचे भाव आज ४ हजार ते ४ हजार ५०० रुपयांच्या दरम्यान होते. कांद्याच्या भावातील चढ उतार कायम राहू शकतात, असा अंदाज कांदा बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला.

देशभरात मागील दोन महिन्यांपासून ज्वारीचे भाव नरमलेले आहेत. ज्वारीच्या भावातील नरमाई वाढल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. आता खरिपातील ज्वारीही काही बाजारांमध्ये दाखल होत आहे. दुसरीकडे ज्वारीला उठावही चांगला आहे. पण शेतकऱ्यांना अपेक्षित भाव मिळत नाही. सध्या बाजारात ज्वारीला गुणवत्ता आणि वाणाप्रमाणे प्रतिक्विंटल सरासरी २ हजार ५०० ते ३ हजार २०० रुपयांच्या दरम्यान भाव मिळत आहे. ज्वारीच्या भावावरील दबाव कायम राहू शकतो, असा अंदाज ज्वारी बाजारातील व्यापारी व्यक्त करत आहेत.राज्यातील बाजारात हिरव्या मिरचीचे भाव टिकून आहेत. बाजारात हिरव्या मिरचीची आवक काहिशी वाढलेली दिसते. पण बाजारात मागणीही चांगली आहे. त्यातच नुकत्याच झालेल्या पावसाचा मिरची पिकाला मोठा फटका बसला. त्यामुळे मिरचीला उठाव मिळत आहे. बाजारात मिरचीचे भाव सध्या ३ हजार ते ४ हजार रुपयांच्या दरम्यान भाव मिळत आहे. पुढच्या काळात बाजारातील मिरची आवक काहिशी वाढू शकते, असा अंदाज आहे. त्यामुळे मिरचीचे भाव टिकून राहू शकतात, असा अंदाज बाजारातील व्यापारी व्यक्त करत आहेत.

## रब्बी टोमॅटो लागवडीसाठी 'या' पद्धतीने करा रोपवाटिका व्यवस्थापन



खरीप महिन्यात टोमॅटोची कमी झालेली लागवड आणि पावसामुळे पिकांचे झालेले नुकसान व पर्यायाने उत्पादनात घट यामुळे बरेच शेतकरी आता रब्बी टोमॅटो लागवडीकडे वळण्याची शक्यता आहे. रब्बी हंगामात सप्टेंबर ते ऑक्टोबर या कालावधीत रोपवाटिकेत रोपे तयार केली जातात आणि ऑक्टोबर ते नोव्हेंबर महिन्यात रोपांची पुनर्लागवड केली जाते. रोपवाटिकेत टोमॅटो पिकाचे व्यवस्थापन कसे करायचे याविषयी महत्वाची माहिती जाणून घेऊ या.

रोपवाटिकेत टोमॅटो लागवड व्यवस्थापन :

साधारणपणे सरळ वाणासाठी १६० ग्रॅम बियाणे तर संकरित वाणांसाठी ५० ग्रॅम बियाणे प्रति एकर पुरेसे आहे. लागवडीपूर्वी बियाण्यांना बीजप्रक्रिया करण्यासाठी थायरम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम किंवा ट्रायकोडर्मा २.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणात चोळावे. त्यानंतर ॲझोटोबॅक्टर २.५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळावे. साधारणपणे १ एकर क्षेत्रावर लागवड करण्यासाठी १.२ गुंठे क्षेत्रावर रोपवाटिका पुरेशी असते. रोपवाटिकेची जमीन आडवी व उभी नागरून कुळवाच्या दोन पाळ्या द्याव्यात. त्यानंतर ३ मीटर लांब, १ मीटर रुंद आणि १५ सें.मी. उंचीचे गादीवाफे तयार करावेत. गादी वाफ्यामध्ये ५ किलो चांगले कुजलेले शेणखत, ८० ग्रॅम १९:१९:१९ किंवा १०० ग्रॅम १५:१५:१५ आणि २०० ग्रॅम निंबोळी पेंड चांगले मिसळावे. सोबत ट्रायकोडर्मा ५० ग्रॅम एकसारखे मिसळून घ्यावे. जेणेकरून रोप वाटिकेमध्ये मर रोगाचा प्रादुर्भाव टाळला जाईल. गादी वाफ्यावर हाताने किंवा खुरप्याच्या सहाय्याने १० सें.मी. अंतरावर रेषा ओढून त्यामध्ये १ सें.मी. अंतरावर बी पेरावे.

लगेच बी मातीने झाकून झारीने हलके पाणी द्यावे. साधारण ५ ते ८ दिवसांत बी उगवते. बी उगवे पर्यंत झारीने पाणी द्यावे. नंतर जमिनीच्या मगदूरानुसार पाटाने पाणी द्यावे. पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. रोपे उगवल्यानंतर ६०- १०० मेश नायलॉन नेट किंवा पांढरे पातळ कापड २ मीटर उंची पर्यंत मच्छरदाणी प्रमाणे गादीवाफ्यावर लावून रोपे झाकून घ्यावीत. रोपे २५ ते ३० दिवसांत पुनर्लागवडीसाठी तयार होतात.

## उत्पादन वाढीसाठी किण्वित सेंद्रिय खत




सेंद्रिय खते विकत घेऊन घालणे सर्वच पिकांसाठी शक्य होत नाही. बहुतांश सर्व शेतकरी सेंद्रिय खतांच्या शिफारशीकडे दुर्लक्ष करून रासायनिक खत वापरताना दिसतात. परिणामी जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वेगाने कमी होत गेले आहे. या बाबींचा विचार करून भारत सरकारद्वारे पीएम प्रणाम ही योजना राबवली आहे. त्यामध्ये जमिनीचे आरोग्य व सुपीकता वाढविण्यासाठी राज्य व केंद्रशासित प्रदेश यांना पर्यायी खते उदा. सेंद्रिय अथवा जैविक खते यांचा वापर वाढविण्यासाठी अनुदानावर दिली जात आहेत. त्यासाठी कृषी विभागाकडून रासायनिक खत पुरविणाऱ्या मोठ्या खत कंपन्यांना या खतांच्या विक्रीसंदर्भात सूचना दिल्या आहेत. या योजनेअंतर्गत, भारत सरकारने किण्वित सेंद्रिय खतासाठी (एफओएम) साठी प्रति टन रुपये पंधराशे इतकी रक्कम बाजार विकास सहकार्यासाठी पुरवठादार किंवा उत्पादकांना देऊ केली आहे.

किण्वित सेंद्रिय खत (एफओएम) म्हणजे काय? : वनस्पती अथवा प्राण्यांचे अवशेष हवारहित स्थितीमध्ये कुजवून आंबविल्यानंतर तयार होणाऱ्या खतांना किण्वित सेंद्रिय खत (एफओएम) असे म्हणतात. या आंबविण्याच्या प्रक्रियेमध्ये ईस्ट, लाईम, लॅक्टिक ॲसिड बॅक्टेरिया आणि विविध प्रकारच्या सुमारे ८० सूक्ष्मजिवांच्या प्रजातींचे मिश्रण केले जाते.एफओएमचे विशेष फायदे : मातीशास्त्र व कृषी रसायनशास्त्र कृषी संस्था, नैनी आणि सॅम हिंगिनबोटम तंत्रज्ञान व शास्त्र कृषी विद्यापीठ, प्रयागराज, उत्तर प्रदेश यांनी संयुक्तपणे हिरवा वाटाणा या पिकासाठी मातीमध्ये एफओएम आणि मायकोऱ्हायजा यांचा वापर करून प्रयोग केले. त्यामुळे मातीवर होणाऱ्या भौतिक व रासायनिक परिणामांचा अभ्यास करून काही नोंदी नोंदवल्या. त्यानुसार जमिनीची सच्छिद्रता ४४.६८% वरून ५२.८१ टक्क्यापर्यंत (म्हणजेच ८.१९%) वाढली. जलधारण क्षमता ४३.५२% वरून ४८.५३% (म्हणजेच पाच टक्के) इतकी वाढली. या खतांच्या वापरामुळे जमिनीतील जिवाणूंची गुणवत्ता व संख्या वाढते. ते जमिनीतील अन्नद्रव्याचे खनिजांमध्ये रूपांतर करतात. ते जमिनीतील सेंद्रिय पदार्थांचे विघटन होऊन त्यांची साधी संयुगे तयार होतात. ती पिकांकडून सहजपणे शोषली जातात. पिकांची रोगप्रतिकारक क्षमता वाढते व पीक निरोगी राहते. मिथेन अथवा कार्बन डाय-ऑक्साइड सारखे हरितगृह वायू कमी होत असल्यामुळे पर्यावरण पूरक आहे. जैविक खतांच्या उपलब्धतेमुळे रासायनिक खताची मात्रा निश्चितच कमी करता येते. पीक उत्पादनाचा दर्जा व चव सुधारते. हे खत १००% सेंद्रिय असून, पिकाच्या गरजेनुसार अन्नद्रव्याची उपलब्धता केली जाते. रासायनिक खतामध्ये बचत झाल्यास त्याच्या आयातीसाठी खर्च होणारे परकीय चलन वाचू शकेल. यामुळे पिकांची व्यवस्थित वाढ होते. त्याबरोबर जमिनीतील कार्बन, नत्र गुणोत्तर सुद्धा सुधारते. शेणखताच्या तुलनेमध्ये टाकण्याची मजुरी, वाहतूक खर्च कमी राहतो. शेणखतातून गवताचे बी शेतात जाऊन वाढणारी तणांची समस्या टाळता येते.

## ॲस्टर फूल लागवड पद्धत



हे हंगामी फुलपीक असून त्यामध्ये पांढऱ्या, लाल, गुलाबी, जांभळ्या रंगाची फुले विशेषतः आढळतात. ॲस्टरची लागवड संपूर्ण देशात तसेच राज्यात मोठमोठ्या शहरांच्या भोवती केली जाते. ॲस्टरची फुले फुलदाणीत सजावटीसाठी तसेच हारांमध्ये वापरली जातात. ॲस्टरची फुले व कट फ्लावर म्हंणून तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये वापरली जातात. बगीच्यामध्ये रस्त्यालगत तसेच कुंड्यांमध्ये ॲस्टरची लागवड केली जाते.

हवामान व जमीन : ॲस्टर हे मुख्यत्वे करून थंड हवामानाचे पिक असुन त्याची लागवड वर्षातील तिन्ही हंगामात केली जाते. जास्तीत जास्त दर्जेदार फुले मिळण्यासाठी बियाण्याची रोपासाठी पेरणी सप्टेंबर / ऑक्टोबर महिन्यात करावी. ॲस्टरची लागवड निरनिराळ्या जमिनीमध्ये करतात. परंतु पाण्याचा उत्तम निचरा होणारी मध्यम ते भारी जमीन या पिकास चांगली मानवते. काळी कसदार भारी व पाण्याचा निचरा न होणाऱ्या जमिनीत रोपांची मर मोठया प्रमाणावर होते. निकास आणि हलक्या जमिनीत पिकाची वाढ खुंटते.

जाती : ॲस्टरच्या पिकाची वर्गवारी ही झाडाची वाढीची सवय, फुलांचा आकार पाकळ्यांची संख्या व पाकळ्यांची ठेवण यानुसार केली जाते. कामिनी, पौर्णिमा, शशांक, व्हायलेट कुशन, फुले गणेश पिंक, फुले गणेश परपल, फुले गणेश व्हाईट, ड्वार्फ क्विन, पिर्नेचिओ, अमेरिकन ब्युटी, स्टार डस्ट, जायंट ऑफ कॅलिफोर्निया, सुपर प्रिन्सेस.

लागवड : ॲस्टर या पिकाची बियाण्याद्वारे करण्यात येते. बियाण्याची पेरणी केल्यानंतर ७ ते ८ दिवसांत बियाण्याची उगवण सुरु होते. बियाणाच्या उत्कृष्ट उगवणीसाठी सुमारे २० ते ३० से. इतक्या तापमानाची आवश्यकता असते. ऍस्टरच्या बियाण्यास विश्रांती कालावधी नसल्याने बियाणे फुलातून काढल्यानंतर ताबडतोब पेरले तरी उगवते.

लागवडीपूर्व तयारी : लागवडीपूर्वी जमिनीची २ वेळा खोल नांगरट करावी व २ ते ३ वेळा फणनी करावी. धसकटे व हरळीच्या काशा वेचून घेऊन जमीन स्वच्छ करावी. हेक्टरी २० ते २५ मे. टन शेणखत जमिनीत चांगले मिसळून घ्यावे. शेणखताबरोबरच प्रति हेक्टरी ९० कि. नत्र, १२० कि. स्फुरद व ६० कि. पालाश जमिनीत चांगले मिसळून घ्यावे व नंतर ६० सें. मी. अंतरावर सरी वरंबे तयार करावेत. त्यानंतर सऱ्यांची नाके तोडून पाणी पुरवठ्याच्या सोयीनुसार वाफे करून घ्यावेत.

लागवड : महाराष्ट्रात जमिनी चांगल्या मध्यम / भारी असल्यामुळे सरी वरम्ब्यावरच लागवड करावी. ॲस्टरची लागवड ६० 30 सें. मी. किंवा ४५ ३० सें. मी. अंतरावर करतात. सरी वरंबा पद्धतीने लागवड करताना वरंब्याच्या मध्यभागी लागवड करावी. रोपांची लागवड सायंकाळी ४ वाजेनंतर व भरपूर पाण्यात करावी, म्हणजे रोपांची मर होणार नाही.

पाणी व्यवस्थापन : ॲस्टर पिकास करावयाचा पाणीपुरवठा मुख्यत्वे जमिनीचा प्रकार, वातावरण व हंगाम यावर अवलंबून असतो. ॲस्टर पिकाच्या मुळ्या जास्त नसल्यामुळे लागवड केलेले वरंबे नेहमी वापसा अवस्थेत राहतील याची काळजी घेणे जरुरी आहे. साधारणपणे ऍस्टर पिकास ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाणी दयावे. ऍस्टर पिकास कळ्या येऊ लागल्यानंतर फुले येईपर्यंत पाण्याच्या ताण देऊ नये. अन्यथा फुलांच्या उत्पादनावर त्याचा विपरीत परिणाम होतो.

पीक संरक्षण : ॲस्टर या पिकावर मुख्यत्वे मावा, नागअळी, काळी पोखरणारी अळी, खोड पोखरणारी अळी या किडींचा व मर, मूळ कुजवा या रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. वरील किदूल व रोगांपासून ॲस्टर या पिकाचे संरक्षण करण्यासाठी कोणतेही किटकनाशक / बुरशीनाशक घेऊन त्यात १५ मि. ली./ १० लिटर पाणी या प्रमाणात स्टिकर्स मिसळावे व वारा शांत असताना शक्यतो सकाळी १०.०० पूर्वी किंवा सायंकाळी ४.०० नंतर फवारणी करावी.

फुलांची काढणी व उत्पादन : ॲस्टरची लागवड केल्यानंतर १० ते १२ आठवड्यांनी फुले तोडणीसाठी तयार होतात. ॲस्टरच्या फुलाची तोडणी दोन प्रकारे केली जाते. एक प्रकार म्हणजे पूजेसाठी किंवा सजावटीसाठी पूर्ण उमललेली फुले तोडली जातात व दुसरा प्रकार म्हणजे काही प्रमाणात फुले उमलल्यानंतर पूर्ण झाडच जमिनी वर छाटले जाते. फक्त फुलांची तोडणी करावयाची झाल्यास सकाळी लवकर तोडणी करावी व पूर्ण झाड फुलदांडयासाठी वापरायचे असल्यास सायंकाळी झाड छाटून ताबडतोब स्वच्छ पाण्यामध्ये ठेवावे. ॲस्टरची लागवड करतांना शिफारसीनुसार सर्व लागवड पद्धतींची अंमलबजावणी केल्यास १२ ते १५ मे. टन प्रति हेक्टर याप्रमाणे उत्पादन मिळते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५४३ : नऊ महिने वयाची मेरी स्टुअर्ट ही स्कॉटलंडची राणी बनली.
१७७६ : अमेरीकेतोल कॉन्टिनेंटल काँग्रेसने ''औपचारिकरित्या 'सयुक्त वसाहती' हे नाव बदलून ''युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका'' असे ठेवले.
१७९१ : वॉशिंग्टन डी.सी हे शहर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या नावावर ठेवण्यात आले.
१८३९ : जॉन हर्षेल याने जगातील पहिले छायाचित्र काचेच्या पट्टीवर घेतले.
१८५० : कॅलिफोर्निया हे अमेरिकेचे ३१ वे राज्य बनले.
१९२० : साली अलीगढ येथील एंग्लो ओरिएंटल महाविद्यालयाचे रुपांतर मुस्लिम विश्वविद्यालयात झाले.
१९३९ : मुंबईच्या 'सेंट्रल' सिनेमामधे 'प्रभात'चा 'माणूस' हा चित्रपट प्रदर्शित झाला. फिल्म जर्नॅलिस्टस असोसिएशनने १९३९ सालातील सर्वोत्कृष्ट चित्रपट असा बहुमान त्याला दिला.
१९४५ : दुसरे चीन जपान युद्ध जपानने चीनसमोर शरणागती पत्करली.
१९९० : श्रीलंकन सैन्याने बट्टिकलोआ येथे १८४ तामिळींची हत्या केली.
१९९१ : ताजिकिस्तानने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे घोषित केले.
१९९७ : सात वेळा राष्ट्रीय विजेतेपद मिळवलेल्या प्रवीण ठिपसे याला बुद्धिबळातील सर्वोच्च असा 'ग्रँडमास्टर' किताब देण्याची घोषणा जागतिक बुद्धिबळ महासंघाने केली.
१९८५ : मूकबधिर जलतरणपटू तारानाथ शेणॉय याने तिसर्यांदा इंग्लिश खाडी पोहून पार करुन विक्रम केला.
२००१ : व्हेनिस येथील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात मीरा नायर दिग्दर्शित 'मॉन्सून वेडींग' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा 'गोल्डन लायन' पुरस्कार मिळाला.
२००९ : ठीक ९ वाजुन ९ मिनिटे व ९ सेकंदांनी 'दुबई मेट्रो'चे उद्घाटन झाले.
२०१५ : एलिझाबेथ (दुसरी) युनायटेड किंग्डम वर सगळ्यात जास्त काळ राज्य करणारी राणी बनली.
२०१६ : उत्तर कोरियाने पाचवी अण्वस्त्र चाचणी पूर्ण केली आहे.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२८ : लिओ टॉलस्टॉय रशियन लेखक (मृत्यू: २० नोव्हेंबर १९१०)
१८५० : भारतेंदू हरिश्चंद्र आधुनिक हिन्दी साहित्याचे जनक मानले जाणारे हिन्दी साहित्यिक, १८५० ते १९०० हा काळ हिन्दी साहित्यात 'भारतेंदू काळ' म्हणून ओळखला जातो. (मृत्यू: ६ जानेवारी १८८५)
१८७४ : प्रसिद्ध भारतीय ओडिया भाषिक लेखक आणि भाषातज्ञ गोपालचंद्र प्रहराज यांचा जन्मदिन.
१८९० : कर्नल सँडर्स 'केंटुकी फ्राईड चिकन' चे संस्थापक (मृत्यू: १६ डिसेंबर १९८०)
१९०४ : भारतीय-पाकिस्तानी हॉकी खेळाडू फिनोझ खान यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल २००५)
१९०५ : भारतीय तत्त्वज्ञानी आणि कवी ब्रह्मारीश हुसैन शा यांचा जन्म. (मृत्यू: २४ सप्टेंबर १९८१)
१९०७ : साली राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसचं, सर्वोत्कृष्ट परराष्ट्रीय अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय चित्रपटसृष्टीतील एक प्रणेते निर्माता-दिग्दर्शक मेहबूब खान यांचा जन्मदिन.
१९०९ : लीला चिटणीस अभिनेत्री (मृत्यू: १४ जुलै २००३)
१९१० : नवलमल फिरोदिया गांधीवादी, स्वातंत्र्यसैनिक आणि उद्योगपती (मृत्यू: २६ मार्च १९९७)
१९३२ : प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक रचनाकार कांती कुमार जैन यांचा जन्मदिन.
१९४१ : अबीद अली अष्टपैलू क्रिकेटपटू
१९५० : श्रीधर फडके संगीतकार
१९६७ : साली सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेता, निर्माता, मार्शल आर्टिस्ट अक्षय कुमार यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१४३८ : एडवर्ड पोर्तुगालचा राजा (जन्म: ३१ आक्टोबर १३९१)
१९७६ : माओ त्से तुंग आधुनिक चीनचे शिल्पकार, मुत्सद्दी, मार्क्सवादी-लेनिनवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते (जन्म: २६ डिसेंबर १८९३)
१९७८ : वॉर्नर ब्रदर्स चे सहस्थापक जॅक एल. वॉर्नर यांचे निधन. (जन्म: २ ऑगस्ट १८९२)
१९४७ : साली भारतातील सुविख्यात कलामर्मज्ञ तथा चिंतक आनंद कुमारस्वामी यांचे निधन.
१९४२ : स्वातंत्र्यसैनिक शिरीष कुमार यांचा गोळी लागून मृत्यू. (जन्म: २८ डिसेंबर १९२६)
१९६० : अली सिकंदर ऊर्फ 'जिगर मोरादाबादी' उर्दू कवी व शायर (जन्म: ६ एप्रिल १८९०)
१९९४ : सत्यभामाबाई पंढरपूरकर लावणीसम्राज्ञी (जन्म:)
१९९७ : आर. एस. भट 'युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया'चे पहिले अध्यक्ष (जन्म: )
१९९९ : पुरुषोत्तम दारव्हेकर नाटककार व लेखक (जन्म:१९२७)
२००१ : अफगणिस्तानचे उपराष्ट्राध्यक्ष व परराष्ट्रमंत्री अहमदशाह मसूद यांची हत्या (जन्म: २ सप्टेंबर १९५३)
२०१० : वसंत नीलकंठ गुप्ते समाजवादी कामगारनेते, लेखक व समाजवादाचे अभ्यासक (जन्म: ९ मे १९२८)
२०१२ : व्हर्गीस कुरियन भारतीय दुग्धोत्पादनातील 'धवल क्रांती'चे जनक, 'अमूल'चे संस्थापक, राष्ट्रीय दुग्धोद्योग विकास महामंडळाचे () संस्थापक अध्यक्ष, पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, रॅमन मॅगसेसे पारितोषिक विजेते (२६ नोव्हेंबर १९२१ कोहिकोड, केरळ)

# शहराचे सांस्कृतिक वैभव टिकविण्यासाठी प्रयत्न-जयदत्त क्षीरसागर

बीड। प्रतिनिधी

बीड शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्याचा प्रयत्न आणि सातत्याने केला आहे बीड जिल्हा संतांची भूमी जशी आहे तशी कलाकारांची भूमी आहे या भूमीत अनेकांमध्ये कलाकार दडलेले आहेत, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा हाच आमचा हेतू असतो असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे काकू नाना प्रतिष्ठान आणि जयदत्त अण्णा क्षीरसागर विचार मंचच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या होम मिनिस्टर चंपावती सम्राज्ञी २०२४ खेळ पैठणीच्या अंतिम फेरी ग्रँड फिनाले मेडिकल कॉलेजच्या मैदानात आयोजित करण्यात आला होता प्रारंभी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शुभारंभ करण्यात आला यावेळी अरुण डाके, डॉ विजुताई महिंद्रे-क्षीरसागर, सिनेअभिनेता आणि निवेदक क्रांती नाना माळेगावकर,बालकलाकार माळेगावकर,महिला आघाडी प्रमुख जयश्रीताई विधाते नगरसेवक मुखिद लाला, नाना मस्के, ॲड शेख खाजा, कीर्तीताई पांगारकर उषाताई सरवदे, भारती क्षीरसागर, अंजली पवार, जयश्री मेहत्रे, आणि तब्बल वीस दिवस प्रत्येक प्रभागात उत्कृष्ट सूत्रसंचालन करून कार्यक्रम यशस्वी करणारे निवेदक सुरेश साळुंके आदी उपस्थित होते

यावेळी माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की,राजकारण आणि समाजकारण या व्यतिरिक्त स्वर्गीय काकूंच्या काळापासूनच आम्ही जनतेची नाळ कधी तुटू दिली नाही कुठलाही जातीभेद न करता अल्पसंख्यांक असतानाही बीड शहराच्या मतदार संघाच्या आणि जिल्ह्याच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील राहिलो आहोत, बदलत्या राजकारणामुळे प्रचंड अफवांचे पेव फुटले आहे पण अशाही परिस्थितीत आम्ही समाजाचे काहीतरी देणे लागतो या उदात्त भावनेतून लोकांच्या हिताचे जे असेल ते करण्याचा प्रयत्न करत असतो बीड शहरात सांस्कृतिक वैभव टिकावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न आम्ही केलेले आहेत मोठे मोठे कार्यक्रम आयोजित करून बीडच्या जनतेला सुखदुःखातून विरंगुळा मिळावा हाच यामागचा हेतू आहे बीड जिल्हा ही जशी संतांची भूमी आहे तसेच कलाकारांची देखील खाण आहे.



या माध्यमातून महिलांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचा प्रयत्न गेल्या २० दिवसापासून सुरू आहे प्रत्येक प्रभागात झालेला कार्यक्रम आम्ही बघत आहोत, महिलांमधील प्रचंड आत्मविश्वास यातून दिसून आला आहे फक्त चूल आणि मुल नव्हे तर स्वतःच्या आनंदासाठी मोकळा श्वास घेण्यासाठी महिला पुढे सरसावते यातच खरा आनंद आहे,बदलत्या तंत्रज्ञानामुळे आपल्या आवडीनिवडी बाजूला होऊ लागले आहेत होम मिनिस्टरच्या माध्यमातून महिलांनी घेतलेला जो आनंद आहे तो अतिशय वाखाण्याजोग आहे, पैठणी हे निमित्त मात्र जरी असले तरी यातून हजारो महिलांनी घेतलेला आनंद पैठणीपेक्षा महत्त्वाचा आहे आणि तोच आम्ही मिळून दिला हेच या कार्यक्रमाचे फलित आहे आपल्या परंपरा जपण्यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत आणि हे प्रयत्न यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करणारा पुढे असायला हवा येणाऱ्या काळात ज्या ज्या लोकहिताच्या गोष्टी असतील त्या करण्यासाठी माझा नक्कीच प्रयत्न असणार आहे, घरातील स्त्री ही खूप महत्त्वाची असते स्त्रीने मनात आणले तर चंद्रावर जाऊन जगाचा कानोसा घेण्याची ताकद तिच्यात असते हे विज्ञानाने देखील सिद्ध केले आहे बुद्धी आणि शक्तीच्या बळावर आता कुठलीही गोष्ट अशक्य नाही याच स्त्रीशक्तीचा जागर येत्या काळात झाला पाहिजे यासाठी प्रत्येक स्त्रीने आपले पाल्य शिक्षित करणे,संस्कारित करणे महत्वाचे आहे,घराला घरपण देणाऱ्या स्त्रीने जर ठरवले तर मोठमोठे चमत्कार होतात चांगल्याची संगत खूप महत्त्वाची असते, आपल्या हिताचे काय आहे हे महिलांना चांगले कळते म्हणून इथे उपस्थित महिलांना विंनती करेल की आगामी काळात आपला असाच उत्साह आणि पाठिंबा मिळेल एवढीच अपेक्षा करतो असे ते म्हणाले भाषणानंतर खेळ पैठणीचा सुरू करण्यात आला यावेळी मेडिकल कॉलेजचे मैदान महिलांनी पूर्ण भरले होते,अंतिम फेरीत ज्या महिला विजेत्या होतील त्यांना शुभेच्छा दिल्या

## निरामय आरोग्यात काकू- नाना प्रतिष्ठानचे योगदान- डॉ.खान

बीड । प्रतिनिधी

लोकनेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे संकल्पनेतून काकू नाना प्रतिष्ठान,आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षिरसागर वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित महात्मा गांधी रुग्णालय व राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत मा.उपमुख्यमंत्री (गृह /विधी व न्याय)मंत्रालय मुंबई. यांच्या समन्वयाने मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर बीड तालुक्यातील बेलखंडी पाटोदा येथे दिनांक ७ ऑक्टोबर २०२४ ला आयोजित केले होते.याप्रसंगी बोलताना डॉ.खान म्हणाले की, लोकनेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून तसेच काकू नाना प्रतिष्ठानचे डॉ.अरुण भस्मे, प्राचार्य महेंद्र गौशाल, समन्वयक




अंजली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली २०ऑगस्ट पासून बीड तालुक्यातील विविध गावांत जाऊन विविध प्रकारच्या आजारांनी त्रस्त रुग्णांवर मोफत तपासणी करून औषधोपचारासह आवश्यकतेनुसार ईसीजी,रक्त तपासणी केली जाते.अशा समाजोपयोगी शिबिरांमधून लोकांच्या निरोगी आरोग्यात काकू - नाना प्रतिष्ठानचे मोठे योगदान असल्याचे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

या शिबिरात सी एच ओ डॉ.प्राची इनकर,डॉ.कोमल शिनगारे, प्रशिक्षणार्थी डॉ.तन्मयी लोंढे,आरती डोरले यांनी रुग्णांची तपासणी केली.

## दिपावलीनिमित्त साखर वाटप सुरू –जगताप

माजलगाव दि.०९: माजलगाव तालुक्यातील सावरगाव येथील छत्रपती साखर कारखान्याची दिपावली सणानिमित्त सर्व सभासदांना व लाभधारक सभासदांना सवलतीच्या दरात दि.११/१०/२०२४ ते दि.२१/१०/२०२४ या



कालावधीत साखर वाटप सुरू आहे. तरी सर्व सभासदांनी आपले आधार कार्ड ओळखपत्र दाखवून आपली साखर आपल्या भागातील शेतकी विभागीय कार्यालय सावरगाव, मालीपारगाव, माजलगाव , छोटेवाडी, निपाणी टाकळी, पात्रुड, तेलगाव या विभागावरून घेऊन जावी असे आवाहन कारखान्याचे व्हा.चेअरमन मोहनराव जगताप यांनी केले आहे. तसेच दसरा व दिपावलीच्या सर्व सभासदांना हार्दिक शुभेच्छा.

## लाडक्या बहिणींची वसूली भाऊजींकडून; रकार हे बरं नव्हं – प्रा.ईश्वर मुंडे

धारूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान सभेच्या निवडणूका डोळयासमोर ठेवून अभद्र महा युती सरकारने एकीकडे मोफत योजनांची खैरात सुरू केली आहे तर दुसरीकडून विविध गोष्टींचे भाव वाढवून वसूली करून जनतेला भुरळ पाडण्याचा प्रकार चालू आहे हे सुजान जनतेला दिसत आहे.या मोफत योजना म्हणजे एका हाताने द्यायचे व दुसऱ्या हाताने परत घ्यायचे यालाच रांगत जाते अन सांगत येते असे म्हणतात अशी खरमरीत टिका राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख प्रा.ईश्वर आनंदराव मुंडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

प्रा.ईश्वर मुंडे पुढे म्हणाले की,राज्यातील गोर गरीब जनतेच्या हिताच्या योजना राबवणे बद्दल कोणत्याही पक्षाचे दुमत नसते परंतू राज्य दिवाळखोरीत आसताना कुठल्याही ठोस उत्पन्नाची तरतूद नसताना फक्त मतांवर डोळा ठेवून रीन काढून सन चालला आहे हे योग्य नाही. जन कल्याणाच्या विविध योजना राबवून समाजातील शेवटच्या घटकाचा सर्वांगीण विकास करणे हेच सरकारचे कर्तव्य आसते परंतू या साठी राबवण्यात येणाऱ्या योजना ह्या कायम स्वरूपी असाव्यात लागतात,या योजनांसाठी लागणाऱ्या



पैशांसाठी कायम स्वरूपी उत्पन्नाची तरतूद करणे आवश्यक आसते हे न करता जीवन आवश्यक वस्तूंचे भाव वाढवून मोफत योजनांची खैरात करणे योग्य नाही. शेती मालाला योग्य भाव न देता तो कमी करणे,दूधाला भाव वाढ न देणे,जनावरांचे खाद्य, जनतेचे खाद्य पदार्थ तसेच जीवन आवश्यक वस्तूंचे भाव वाढवणे एवढेच नाही तर मद्य पेयांचे भाव वाढवून पैशांची वसूली करायची हे जनता उघडया डोळ्यांनी पहात आहे.महाराष्ट्रातील महीलांना सुरक्षा,संरक्षण व हाताला काम पाहीजे, त्यांच्या पतीला सन्मानाचा रोजगार पाहीजे,मुलांना मोफत व दर्जेदार शिक्षण पाहीजे हे न करता शाळा बंद करणे, कंत्राटी शिक्षकांची भरती करणे, काम करत असलेल्या शिक्षकांचा अनुदान टप्पा वाढ न देता,शेतकऱ्यांचे विविध विभागाचे अनुदान न देता,अनेक विभागांच्या विविध लाभार्थ्यांचे अनुदान न देता फक्त लाडकी बहीन,लाडकी बहीन म्हणत त्यांच्या मतांवर डोळा ठेवून जनतेच्या पैशाची खैरात करून पण आता महा युती सरकार ची खैर नाही कारण निवडणूकीत लाडक्या बहीणी लाडक्या भाऊजींना किंवा लाडक्या भाच्याला विचारूनच मतदान करतात हे लक्षात ठेवा.अशी कान पिळणी प्रा.ईश्वर मुंडे यांनी केली आहे.

## कधीही आवाज द्या, धस कुटुंबीय प्रत्येकाच्या सुखादु:खात सदैव हजर - जयदत्त धस

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज माजी राज्यमंत्री सुरेश धस यांच्या प्रचारार्थ आज शेरी बु येथे सवांद दौरा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी जयदत्त धस बोलत असताना युवकांच्या अडीअडचणी,गावातील समस्या समजून घेतल्या तसेच मूलभूत सुविधा लाईट, रस्ता,शाळा अशा अनेक विषयावर चर्चा करून त्यावर संबंधित अधिकारी यांना फोन करून तात्काळ सोडवण्यास सांगितले. पुढे बोलताना जयदत्त धस म्हणाले की आमचे कुटुंब हे जातीपातीच्या पलिकडे जाऊन सर्वांच्या सुखादु:खात सतत पाठीशी खंबीरपणे उभे रहाण्याचे काम करत आहे, राजकीय पटलावर काम करत असताना गेले पंधरा वर्षांपासून मतदार संघातील प्रत्येकाच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी वर्षभर चोवीस तास मा.आ.धस आण्णा उपलब्ध असतात ,



विशेष म्हणजे शेरी गावावर आण्णा चे जास्त प्रेम असून आतापर्यंत सरपंच संदिप खाकाळ यांच्या पाठपुरावाच्या जोरावर कोट्यवधी रुपयांचे कामे दिली असून त्यातील अनेक कामे पूर्ण झाली आहेत तर अनेक कामे प्रगती पथावर आहेत, त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत तुम्ही मतदान रूपाने आशीर्वाद द्या आम्ही नक्कीच त्यातून उतराई होण्यासाठी प्रयत्न करू असा विश्वास जयदत्त धस यांनी दिला.

गेल्या अनेक वर्षांपासून प्राथमिक शाळेचा प्रश्न प्रलंबित असताना अनेकदा त्याविषयी निवेदन दिले अनेक आंदोलन केले परंतु त्याला यश आले नाही, याबाबत आम्ही शाळा खोल्याचा विषय आ.धस आण्णा जवळ काढला अन त्यांनी ताबडतोब शाळा खोल्यासाठी जिल्हा नियोजन योजने अंतर्गत चाळीस लक्ष रुपये मंजूर केले, ते काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. यावेळी जयदत्त धस यांनी शाळा खोल्यांची पहाणी करून सरपंच खाकाळ व ग्रामस्थांचे कौतुक केले. यावेळी गणप्रमुख अस्लम सय्यद,प्रदीप बांदल,महेश खाकाळ,राजू रासकर, श्रीराम सोनवणे, राहुल गोरे,शिवाजी डोरले,परशुराम शिरोळे, निलेश महाडिक, सुखदेव महाडिक,अक्षय गोरे, अक्षय कर्डीले,राजू जाधव किशोर सोनवणे, बाळू खाकाळ, यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. आपल्या गावाचा सर्वांगीण विकास करून गावात परिवर्तन घडवून आणायचे असेल गावातील तरूणांनी खंबीरपणे पाठीशी उभं राहून अण्णाचे हात बळकट करण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन महेश खाकाळ यांनी केले

## एस.एम.देशमुख असणार पहिल्या राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संमेलनाचे उद्घाटक



वडवणी । प्रतिनिधी

येथील मराठी पत्रकार परिषदेच्या कार्यालयात मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा.श्री.एस.एम.देशमुख सर यांची उदगीर ची टीम सर्वश्री सचिन शिवशेट्टे (विभागीय सचिव मराठी पत्रकार परिषद), बिभीशन मद्देवाड अध्यक्ष रंगकर्मी साहित्य कला क्रीडा प्रतिष्ठान, श्रीनिवास सोनी अध्यक्ष उदगीर जिल्हा मराठी पत्रकार परिषद,अर्जुन जाधव हल्ला विरोधी कृती समितीचे उदगीर तालुका समन्वयक,सुनील हवा सचिव उदगीर तालुका मराठी पत्रकार परिषद, सिद्धार्थ सुर्यवंशी सचिव मराठी पत्रकार संघ उदगीर या सर्वांनी आज वडवणी मध्ये भेट घेऊन उदगीर येथे होत असलेल्या २० ऑक्टोंबर २०२४ रोजी पहिल्या राज्यस्तरीय पत्रकार साहित्य सम्मेलनाचे उद्घाटक म्हणून निमंत्रण देण्यात आले. श्री.एस.एम.देशमुख सर यांनी या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून निमंत्रण स्वीकारल्या बद्दल त्यांचे व डिजिटल मिडिया परिषदेचे नव्याने प्रदेशाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल अनिल वाघमारे यांचा संयोजक समितीच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देत आभार व्यक्त करण्यात आले.

## दोन पेक्षा अधिक अपत्य असलेल्या आई-वडीलांचा जैन समाजात सत्कार - हस्तीमल बंब

जालना । प्रतिनिधी

भारतीय जैन संस्था जालनाच्या वतीने तपस्वीचा सत्कार त्याच बरोबर प्रथमच दोन पेक्षा अधिक अपत्य असलेले आई - वडीलांचा अभिनंदन समारोह दि. ६ ऑक्टोबर २०२४ रविवार रोजी जैन भवन, सकलेचा नगर, जालना येथे अति उत्साहात पार पडला. प्रारंभी सौ. मेघा, नेहा, करश्मिा बंब यांनी नमस्कार महामंत्र पठण करून स्वागत गीताने उपस्थित सर्वांना मंत्रमुग्ध केले. भव्य समारोहचे उद्घाटन उद्योजक, समाजसेवी दानशुर गौतम श्रीश्रीमाळ यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान संस्थेचे अध्यक्ष हस्तीमलजी बंब यांनी भुषविले. प्रमुख अतिथी म्हणून समाजातील प्रतिष्ठीत उद्योजक मोतीलाल राका त्याच बरोबर विजयराज सुराणा मंचावर उपस्थित होते. संस्थे तर्फे अतिथी यांचे सत्कार करण्यात आले.

स्वागत प्रास्ताविक करताना श्री हस्तीमलजी बंब म्हणाले माणसाला दिवसभर खाने-पीने, चहा-पुडीची सवय अधिकांशना औषध गोळ्या घ्यावा लागतात. हे सर्व त्याग करून उपवास ठेवणे मोठी तपस्या करणे हा महान कार्य आहे. निरोगी शरीरासाठी पोटातील मश्निरीला फिल्टर करने, आराम देणे त्यासाठी सर्व धर्मात उपवासाचा महत्व आहे. समाजात देशात अनेक वर्षापासून कुटुंब नियोजनाच्या



नावाने आपली जनसंख्या कमी होत चाललेली आहे. पुर्वी हुंडाप्रथा व गर्भपात मुळे मुलींची संख्याचा प्रमाण कमी झाल्याने युवकांचे नाते जुळविणे, लग्न होणे, जीवनसाथी वधु-मिळणे हा समाजात गंभीर प्रश्न निर्माण झाले आहे. गर्भपात हा एक महापाप आहे. जनसंख्या वरती विशेष करून मुलींची हा विषयाला जनजागरण करण्यासाठी, प्रोत्साहन देण्यासाठी दोनपेक्षा अधिक अपत्य असलेले आई-वडीलांचा आपल्या समाजात प्रथमच सत्कार करण्यात आले आहे. नव्याने जनगणना करून दिशा निर्देशिका प्रकाशित करु. समाजातील आर्थिक दृष्टी ने कमकुवत कुटुंबासाठी गृहनिर्माण ची योजना अंतर्गत प्रथम टप्यात १०० घर देण्यासाठी योजना राबू. समाजात कुप्रथा, आडंबर, लग्न समारंभात अनावश्यक खर्च विशेष करुन रस्त्यावर महिला, सुन-मुलींचे नाच-गाने, डांस, अंग प्रदर्शन या सर्वांसाठी समाजात आदर्श आचार संहिता होणे गरजेचे आहे, श्री श्रीश्रीमाळ, श्री राका यांचा समाज कार्यात मोठा योगदान आहे, असे बंब म्हणाले. श्री गौतम श्रीश्रीमाळ मार्गदर्शन करताना हम दो हमारे दो ह्या घोषणा ऐवजी आम्ही दोन आमचे चार हा अभियान गरजेचा आहे, सामाजिक कार्यात सर्वोत्परी सहकार्य करु असे म्हणाले. श्री मोतीलाल राका आपले विचार मांडताना तप-त्याग, तपस्या, जगा आणि जगू द्या हाच भगवान महावीरांचा मुळमंत्र आहे. श्री बंब यांनी समाजसेवेत स्वतःला झोकुन दिले आहे, त्यांचे कार्य प्रशंसनीय आहे, असे राका म्हणाले. श्री सुराणा यांनी ही सत्कार मुर्तीला शुभेच्छा दिल्या. या अभिनंदन समारंभात १५८ तपस्वी व दोन पेक्षा अधिक अपत्य असलेले आई-वडीलांना सन्मानपत्र प्रदान करून सत्कार करण्यात आले. या सोहळ्यासाठी विनोद बंब, कचरुलाल नवलखा, ताराचंद कुचेरिया, बसंतीलाल गोलेच्छा, पार्श्वनाथ अंबेकर, पवनराज सुराणा, ॲड. अभय सेठिया, अजित श्रीश्रीमाळ, पवन अग्रवाल आदिंनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे उत्कृष्ठ सुत्र संचालन व आभार दीपक मोदी यांनी केले.




## बौद्ध धम्माच्या आचरणानेच मानवास संबोधी प्राप्त होते-भिक्खु धम्मशील थेरो

माजलगाव। प्रतिनिधी

मानवाला आपल्या स्वभावाचे पूर्ण ज्ञान होणे, जन्म मृत्यूचे ज्ञान होणे, सर्वज्ञता प्राप्त होणे, अविद्या अज्ञान नष्ट होणे, चार आर्य सत्याचे ज्ञान होणे व दुःख अनित्य अनात्म या गोष्टींचे परिपूर्ण ज्ञान होणे म्हणजेच संबोधी प्राप्त होणे होय. या सर्व बाबी बौद्ध धम्माच्या परिपूर्ण आचरणातून प्राप्त होतात.मानवी जीवन हे दुर्लभ असून पशु इतकेच जीवन जगणे मानवास अपेक्षित नाही.मानवाने साऱ्या दुःखाचा विनाश करण्यासाठी सत्याची प्राप्ती करण्यासाठी आपले जीवन सदोदित कुशल कर्माद्वारे शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपले सर्व इंद्रिय जोपर्यंत क्रियाशील आहेत तोपर्यंत आपले जीवन धम्म मार्गाने जगले पाहिजे. धम्मा प्रमाणे आचरण करणारा व्यक्ती आपल्या जीवनात सुख समृद्धी प्राप्त करू शकतो. धम्मात आचरणाला अत्यंतिक महत्त्व आहे. धम्माच्या आचरणाद्वारेच मानव संबोधि प्राप्त करू शकतो असे प्रतिपादन पूज्य भिक्खू धम्मशील थेरो यांनी श्रावस्ती बुद्ध विहार माजलगाव येथे आयोजित साप्ताहिक बुद्ध वंदना व धम्मदेसना या कार्यक्रमात केले.या पुजेचे यजमान संगीताताई भीमराव कांबळे या होत्या. यावेळी सद्? धम्म सेवा संघाचे,सदाशिव भालेराव, नवनाथ शिनगारे, ॲड. दशरथ मकसरे,सोपान उजगरे, भगवानराव सातपुते, रविकांत उघडे,शामराव वाघमारे, धम्मपाल जावळे, विजय होळीकट्टी, लीलाताई उजगरे, वाल्हाबाई टाकणखार, आधी सदस्य उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन नवनाथ शिनगारे यांनी केले, प्रास्ताविक पांडुरंग जाधव यांनी केले. तर आभार प्रदर्शन जी एन घनघाव यांनी केले. या कार्यक्रमास शहर व तालुक्यातील बहुसंख्य उपासक उपासिका उपस्थित होत्या.

# आष्टी मतदार संघातील सामान्य जनता म्हणू लागली आम्हाला सुरेश धसच हवेत आमदार

**आष्टी । प्रतिनिधी**

आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये आष्टी मतदार संघामध्ये महायुतीकडून माजी आमदार भीमराव धोंडे तसेच अजित पवार गटाचे विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे व माजी राज्यमंत्री सुरेश धस हे उमेदवारीसाठी इच्छुक उमेदवार आहेत तसेच शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस गटात कडून माजी आमदार साहेबराव दरेकर पैलवान सतीश शिंदे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे एडवोकेट नरसिंह जाधव महबूब शेख अशा अनेक इच्छुकांची गर्दी आहे मात्र आष्टी मतदार संघामध्ये जनहितार्थ नेहमी ३ ६५ दिवस अहो रात्र जनतेच्या सुखात दुःखात असणारी धस फॅमिली व या धस फॅमिलीतील करते धरते माजी मंत्री सुरेश धस हे एक असे नेतृत्व आहे जे सामान्यांचे ग्राउंड वरचे सर्व काही कामे असतील ती अगदी मन लावून पूर्ण करतात .मग कुणाचे दवाखान्याचे काम असेल एखाद्या गरीबांच्या मुलीच्या विवाहप्रसंगी त्याला मदत लागत असेल तर सर्वात महत्त्वाचे म्हणजे कोरोनामारीच्या कठीण काळामध्ये या व्यक्तीने आपली जीवाची परवा न करता सामान्य जनतेचे प्राण वाचवण्यासाठी रात्रीचा दिवस करून आष्टी मतदार संघामध्ये मच्छिंद्रनाथ देवस्थान ट्रस्टच्या माध्यमातून कोविड सेंटर सुरू करुन अनेकांना प्राण वाचवण्याचे काम केले. त्यावेळी हे सध्याचे उमेदवारी मागणारी आपले प्राण वाचवण्यासाठी घरात बसले होते तसेच मतदारसंघांमध्ये ज्यावेळी सामान्य जनतेवर वाईट प्रसंग निर्माण होतात मग अपघात असेल तर हे सुरेश आण्णा धस या लोकांना मदतीचा हात देतात तर भिऊ नको मी तुझ्या पाठीशी आहे असा आधार देखील



सुरेश आण्णा धस यांनी अनेकांना दिला आहे अशा लोकांच्या मदतीला धावून येणाऱ्या नेतृत्वालाच आता पुन्हा एकदा २०२४ च्या आमदारकीची संधी मिळावी यासाठी सामान्य जनता बोलू लागली आहे आम्हाला आता आष्टी मतदार संघाचे सुरेश आण्णा धसच आमदार हवे आहेत. सध्याच्या निवडणुकीला जातीय रंग लागला असतांना देखील आमदार तसेच सर्व जाती धर्माला सोबत घेऊन सर्व जाती धर्माच्या लोकाला न्याय देणार नेतृत्व म्हणून मतदार संघामध्ये त्यांचं नाव घेतलं जातं आष्टी मतदार संघात २०१४ ला निसटता पराभव स्वीकारून आमदार धस यांनी अगदी दोन वर्षाच्या कालावधीतच भारतीय जनता पार्टी कडून बीड जिल्हा उस्मानाबाद या किचकट मतदार संघामध्ये विधान परिषदेची निवडणूक लढवून आपल्या कार्यकर्त्यांच्या मोठ्या फळीच्या व आपल्या दांडग्या संपर्काचा जोरावरती हे निवडणूक जिंकून दाखवली या विधान परिषदेच्या आमदार झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस व त्यावेळच्या तात्कालीन पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून त्यांनी मतदारसंघांमध्ये सर्वात मोठी म्हणजे कुंठे फळ साठवण तलाव ही महत्त्वपूर्ण योजना राबवण्यासाठी अक्षरशा लोकांची दगडे खाल्ली व ही योजना आज पूर्णत्वास जात आहे मात्र ज्यावेळी या योजनेवर सध्याचे आजी-माजी आमदार ही योजना पूर्ण होऊ शकत नाही अशी योजना आशिया खंडात कुठेच झाली नाही अशा वल्गना करत होते.तर या योजनेला कुठल्या ना कुठल्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर या लोकांनी विरोध केला. मात्र या विरोधाला जशास तसे उत्तर देत धसांनी आपल्या काम अविरतचालू ठेवले व ही योजना जवळपास ९७ टक्के पूर्ण करण्यात सुरेश धस नावाच्या भागीरथाचा सर्वात मोठा वाटा आहे. हे आष्टीत मतदारसंघाच्या जनतेला ज्ञात आहे त्यामुळे येणाऱ्या २०२४ विधानसभेच्या निवडणुकीत माजी मंत्री सुरेश धस हे आमदार होतील असा सामान्य जनतेला मोठा विश्वास आहे.

## गेवराई तालुका परिवर्तन संघाच्या संघटक पदावर निवड जाहीर; संघटीत परिवर्तन करण्याचा निश्चय -ॲड. संजय भाऊ काळे

**गेवराई । प्रतिनिधी**

विधानसभा मतदारसंघातील सामाजिक कार्यकर्ते, सुजाण नागरिकांनी सध्याच्या परिस्थितीत संपूर्ण परिवर्तन करण्याचे निश्चित केले असून त्या करिता गेवराई तालुका परिवर्तन संघाची संघटनात्मक बांधणी करताना बैठकीत समाजात काम करणाऱ्या समाजासेवकांची संघटक म्हणून सर्वप्रथम श्री श्यामराव गायकवाड पाटील, रामनाथ महाडीक, मा.सरपंच अशोकराव खरात,मनोज शेंबडे पाटील यांची नियुक्ती गेवराई तालुका परिवर्तन संघाचे अध्यक्ष ॲड संजय भाऊंना केली.विधानसभा मतदारसंघातील विकास, नियोजन,नागरिकांच्या अडचणी, सामाजिक कार्यकर्ते यांची यावर चर्चा, विनिमय करण्यासाठी प्रत्यक्ष बैठका , वाट्सअप द्वारे सुसंवाद करण्यासाठी जालना रोड वरील जुन्या बस स्टॅण्ड शेजारच्या परिवर्तन संघाच्या कार्यालयात २८ सप्टेंबर ते २ आक्टोंबर पर्यंत वैचारिक ‘‘परिवर्तन सप्ताह ‘‘ चे आयोजन करून संजय भाऊ स्वतः सर्वांची चर्चा केली,आज समाजातील विविध सामाजिक स्तरावर काम करणाऱ्यांची गेवराई तालुका परिवर्तन संघाच्या संघटक पदी नियुक्ती करण्यात आली.यांचे अभिनंदन डॉ मिलिंद गावडे, मेजर राजेंद्र कापरे, साहेबराव राठोड, सोपानराव टेकाळे,रमेश पिंपळे, सुनील शिंदे यांनी केले.या वेळेस गेवराई ◀◀ पान २ वर

## तेलगाव कारखान्याचे संचालक प्रभाकर पौळ यांना मातृशोक

**परळी । प्रतिनिधी**



सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना तेलगाव चे संचालक परळी तालुक्यातील रामेवाडी/कासारवाडी येथील प्रभाकर पौळ यांना मातृशोक झाला आहे. त्यांच्या आई कान्होपात्राबाई रुस्तुमराव पौळ यांचे वयाच्या ९० व्या वर्षी वृध्दपकाळाने दिनांक ७ ऑक्टोंबर रोजी राहत्या घरी कासारवाडी/रामेवाडी येथे निधन झाले आहे . त्यांचा अंत्यविधी दिनांक ८ ऑक्टोंबर रोजी सकाळी १० वाजता करण्यात आला, कान्होपात्राबाई पौळ अंत्यत मन मिळावू व प्रेमळ स्वभावाच्या होत्या,आक्का म्हणून गावभर त्यांना आदराने लोक बोलत असत,रामेवाडी/कासारवाडी हेच माहेर आणि हेच त्यांचे सासर होते .अंत्यविधीस रामेवाडी/कासारवाडी सह परिसरातील गावचे लोक, राजकीय प्रतिष्ठीत नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते . त्यांच्या पश्चात त्यांचा दोन मुले,सात मुली ,नातवंडे , सुना असा मोठा परिवार आहे.

## नाट्य गृहास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे नाव द्या - आ.लक्ष्मण पवार

**गेवराई । प्रतिनिधी**



शहरातील कोल्हेर रोड येथे वैशिष्ट्य़पूर्ण योजनेंतर्गत उभारण्यात आलेल्या नाट्य गृहाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी आ.लक्ष्मण पवार यांनी दि.७ ऑक्टोबर रोजी पत्राद्वारे केली होती आ.लक्ष्मण पवार यानी केलेल्या मागणीची दखल घेत गेवराई नगरपालिकेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी विक्रम मांडरके यानी घेतलेल्याल्या बैठकीत आ.लक्ष्मण पवार यांच्या आलेल्या पत्रावर कोल्हेररोड वरील उभारण्यात आलेल्या नाट्यगृहाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नाट्यगृह असे नामकरण करण्यासाठी ठराव मंजुर करण्यात आला त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नाट्यगृह नामकरण झाले आहे त्यामुळे नागरिकांत आनंद व्यक्त होत आहे

यापूर्वी गेवराई शहरातील बाजारात तळावरील तापडीया सिटी सेंटरचे महात्माफुले शाँपीग सेंटर असे नामकरण करण्यात आले तसेच छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक सभागृह, छत्रपती शिवाजी महाराज उद्यान असे अनेक नामकरण आ.लक्ष्मण पवार यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे.

## महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला नेणाऱ्या सरकार विरोधात आंदोलन

**म्हसोबावाडी। प्रतिनिधी**

सातत्याने महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला हलवण्यात येत आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील मराठी तरूणांचा रोजगार कमी होत आहेत. सातत्याने केंद्र सरकार व राज्यातील खोके सरकार हे येथील उद्योग गुजरातला जात आहे. यामुळे मराठी तरूण बेरोजगारीने त्रस्त झाला आहे. आशा निर्णयाने हक्काचा रोजगार गमवावा लागत आहे. त्या विरोधात आष्टी येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे



**आष्टीत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राज्यव्यापी धरणे आंदोलन, तहसीलदार यांना दिले निवेदन**

प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दि ७ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयात राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने राज्यव्यापी धरणे आंदोलन करून महायुती सरकारच्या निषेधार्थ आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्रातील सदरील उद्योग गुजरातला हलवण्यात येवू नयेत व मराठी तरूणांना न्याय मिळावा अशा घोषणा बाजीकरून व युवकांनी फलक दाखवून तहसील कार्यालयातील परिसर दणाणून सोडला व राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्यात आले.यावेळी तहसीलदार वैशाली पाटील यांना निवेदन देण्यात आले या आंदोलनात ◀◀ पान २ वर

## अर्धमसला, मुधापुरी, खांडवी, रानमळ्यातील असंख्य कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील अर्धमसला मुधापुरी खांडवी आणि रानमळा येथील शिवाजीराव राऊत बाबासाहेब गिरे यांच्यासह असंख्य राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला असून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी त्यांचे भगवे रुमाल गळ्यात घालून जंगी स्वागत केले आहे.

अर्धमसला येथे दिनांक ७ ऑक्टोबर २०२४ रोजी



शिवसेनेचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या नेतृत्वाखाली अर्धमसला, मुधापुरी, खांडवी आणि रानमळा येथील येथील शिवाजीराव राऊत, बाबासाहेब गिरे यांच्यासह सय्यद रियासद भाई, कमलाकर भिंगारे, लहू कादे, महादेव परदेशी, मिठू राऊत, महारुद्र मिसाळ, योगेश थोपटे, रवी राऊत, किसन सागडे, सागर पवळे, विकास उघडे, धोंडीराम पवळे, सोमीनाथ पिंपळे, पिंटू पवळे, अनिल भिंगारे, गणेश नरवडे, अनिल भोले, सतीश नरवडे, बाळू कानडे, सर्जेराव हटोटे, गणेश गिरे, उपेंद्र गिरे, अण्णा पवार, कल्याण धोत्रे, सुरेश पवार, श्रीमंत भोले, बाळू भोले, प्रभाकर शेजुळ, शेषराव भोले, राजेभाऊ जाधव, संतोष चव्हाण, महारुद्र ◀◀ पान २ वर

## ज्ञानेश्वरीतील आनंदलहरी या विषयावर आज कडा येथे डॉ. विजयकुमार फड यांचे व्याख्यान

**आष्टी । प्रतिनिधी**



दरवर्षीप्रमाणे यंदाही कडा येथील श्रीराम वाचनालयातर्फे शारदीय व्याख्यानमाला कार्यक्रमाचे आयोजन श्रीराम मंदीरात करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे हे ५९ वर्षे असून आज बुधवारी दिनांक ९/१०/२०२४ रात्री ८ ते १० या वेळेत ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड, छत्रपती संभाजीनगर यांचे श्री ज्ञानेश्वरीतील आनंदलहरी या विषयावर व्याख्यान होणार आहे. ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड हे भारतीय प्रशासन सेवेतील कामाचा प्रदीर्घ अनुभव असणारे व संत साहित्याचा गाढा अभ्यास असणारे व्याख्याते आहेत. डॉ. फड हे कीर्तनकार, प्रवचनकार तसेच लेखक आहेत. ज्ञानदास व माऊली या नावाने ओळखले जाणारे फड तणाव मुक्ती, स्पर्धा परिक्षा अभ्यास, आनंदी जीवन अशा विषयावरील व्याख्यानात आपला ठसा उमटवून आहेत. त्यामुळे अशा व्याख्यानाचा लाभ कडा व परिसरातील श्रोत्यांना व्हावा म्हणून फड यांचे व्याख्यान आयोजित केल्याचे संयोजक शंकरराव देशमुख, चंद्रशेखर पाटील, अनिल ढोबळे, दीपक किंबहुने, समीर पाटील, डॉ. अशोक गांधी, डॉ. हरिदास विधाते यांनी केले आहे.

## मोहन घोडके यांचे निधन

**आष्टी । प्रतिनिधी**



मच्छिंद्रनाथ मल्टीस्टेटचे संचालक तथा छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालयाचे शिक्षक असलेले बाळासाहेब घोडके यांचे वडील मोहन गोपीनाथ घोडके यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ८० व्या वर्षी मंगळवार दि ८ रोजी पहाटे दुःखद निधन झाले.

आष्टी शहरात गेल्या अनेक वर्षांपासून व्यापारी क्षेत्रात नावाजलेले मोहन गोपीनाथ घोडके हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. त्यांच्यावरती अहमदनगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार देखील सुरू होते. मात्र मंगळवार दिनांक ८ ऑक्टोंबर रोजी पहाटे चार वाजता त्यांच्या राहत्या घरी त्यांचे निधन झाले. अत्यंत शांत संयमी मितभाषी व कष्टाळू अशी त्यांची प्रतिमा आष्टी शहरात सुपरिचित होती. त्यांच्यावर आष्टी शहरातील हिंदू स्मशानभूमी ◀◀ पान २ वर

## नाट्यशास्त्रविभाग, श्री पंडित गुरू पार्डिकर महाविद्यालयात ‘नृत्य प्रशिक्षण शिबिर संपन्न‘

**सिरसाळा । प्रतिनिधी**

सिरसाळा ता. परळी येथील श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय सिरसाळा, नाट्यशास्त्र विभाग व बलभीम महाविद्यालय, नाट्यशास्त्र विभाग, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सामंजस्य करार अंतर्गत नृत्य प्रशिक्षण शिबिर दि. ०७/१०/२०२४ सोमवार रोजी संपन्न झाले. या प्रसंगी शिबिरास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. केशव भागवत, नृत्य दिग्दर्शक श्री. आशिष लोंढे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. पी. कदम, अधिसभा सदस्य डॉ. एम. बी. धोंडगे, विभागप्रमुख डॉ. चंद्रशेखर कणसे हे उपस्थित होते. सदरील उपक्रमामध्ये महविद्यालयातील विद्यार्थी कलावंतांनी सहभाग घेतला. या संधीचा लाभ परिसरातील सर्वांनी घ्यावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. पी. कदम आणि नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. चंद्रशेखर कणसे यांनी केले होते. या शिबिरात एकूण चाळीस विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सहभागी विद्यार्थ्यांना लोक नृत्य, शास्त्रीय नृत्य तसेच विविध नृत्याचे सैद्धान्तिक बरोबरच प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात आले. ग्रामीण भागातील कलावंतांना व महाविद्यालयातील विद्यार्थी यांना नृत्य या कलेचे ज्ञान, कौशल्य आणि यातील रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हावेत यासाठी नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने हा उपक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. चंद्रशेखर कणसे यांनी केले, सूत्रसंचालन हेकु. वैष्णवी हिने केले तर आभार प्रदर्शन अर्जुन सोनवणे या विद्यार्थ्याने केले. सदरील उपक्रमामध्ये कलावंत, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एससी एसटी आरक्षण उपवर्गीकरण अटीच्या निर्णयाविरोधात बौद्ध समाजाचा तहसील कार्यालयावर धडकला मोर्चा

**मागण्या पूर्ण न झाल्यास यापेक्षाही तीव्र आंदोलनाचा इशारा**

**घनसावंगी । प्रतिनिधी**

अनुसुचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या आरक्षणात उपवर्गीकरण आणि क्रिमीलिअर अटीचा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला तो निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा यासाठी नवीन बस स्टॅन्ड घनसावंगी ते संत रामदास कॉलेज मार्गे तहसील कार्यालय



येथून बौद्ध समाजाच्या वतीने भव्य असा धडक मोर्चा काढण्यात आला या मोर्चामध्ये घोषणाबाजी करत,सरकारच्या विरोधात तीव्र नाराजी व्यक्त करत हा मोर्चा तहसील कार्यालया समोर सभेत रूपांतर होऊन विविध संघटना व विविध पक्षातील कार्यकर्ते व संयोजक समितीच्या वतीने एससी एसटी आरक्षण उपवर्गीकरण व क्रीमिलिअर संदर्भात आपले मत व्यक्त केले.आयोजक समितीच्या वतीने तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना यावेळी निवेदन देण्यात आले.दरम्यान दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दिनांक १/०८/२०२४ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ◀◀ पान २ वर

## सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी राज्य सरकारचा पुढाकार-आ.बबनराव लोणीकर

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात विराजमान असलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वातील महायुतीचे सरकार हे सर्वसामान्यांचे सरकार असून प्रत्येक सर्वसामान्य घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी महायुती सरकारने सातत्याने प्रयत्न केले आहेत केंद्र सरकार प्रमाणेच राज्य सरकारने देखील सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी अनेक योजनांच्या माध्यमातून पुढाकार घेतलेला



आहे सर्व सामान्य नागरिकांना सर्वोत्तम सुविधा मिळावी यासाठी केंद्र व राज्य सरकार सदैव प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

बुधवार, दि. ९ ऑक्टोबर २०२४ | पान ७

# साहित्यिकांनी राजकारण्यांना खडे बोल सुनवावेत : राज ठाकरे

## ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण

पुणे । प्रतिनिधी

देशाला दिशा देणार्या महाराष्ट्राची भाषा अत्यंत खालच्या थराला गेली आहे. राजकारणी खालच्या थराला जाऊन बोलत आहेत. या राजकारण्यांना खडे बोल सुनावण्याचे काम साहित्यिकांनी केले पाहिजे, असे मत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केले. राजकारणी व्यक्तींना साहित्य संमेलनांमध्ये बोलायला नाही, तर ऐकायला बोलवावे, असे सांगून पूर्वीच्या मराठी साहित्यिकांच्या अंगात, मनात मराठी बाणा रुजलेला दिसत होता. परंतु, ती धमक आज कमी झालेली जाणवत असल्याची टीका ठाकरे यांनी केली.

अखिल भारतीय साहित्य महामंडळाच्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या बोधचिन्हाचे अनावरण सोमवारी राज ठाकरे यांच्या हस्ते झाले, त्या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्राची ओळख



दर्शविणारी राजमुद्रा व लेखणी, असे बोधचिन्हाचे स्वरूप आहे. या प्रसंगी सरहद पुणेचे अध्यक्ष संजय नहार, मसापचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, सुनीताराजे पवार, विनोद कुलकर्णी, साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, डॉ. श्रीपाल सबनीस, लक्ष्मीकांत देशमुख, साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष प्रकाश पागे, गुरय्या स्वामी, डॉ. शैलेश पगारिया आदी उपस्थित होते.

राज ठाकरे म्हणाले, सद्य:स्थितीत महाराष्ट्रातील राजकारणाची भाषा अत्यंत खालच्या थराला गेली आहे. अशा परिस्थितीत साहित्यिकांनी सामाजिक चळवळ उभी करण्याची गरज आहे. साहित्यिकांनी ट्रोल होण्याचा विचार न करता अधिकारवाणीने बोलायला हवे. मराठी साहित्याच्या वाढीसाठी ज्या ज्या गोष्टींची गरज लागेल, मदत लागेल ती करू. महाराष्ट्रात चाललेला जो खेळ, सर्कस झालीय, कुणी विदूषकी चाळे करत आहे. मंत्रालयात कुणी जाळ्यांवर उडी मारत आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणात असे अनेक लोक आहेत त्यांना जाळ्यांशिवाय उड्या मारायला लावले पाहिजे. देशाला दिशा देणारे राज्य म्हणजे महाराष्ट्र आहे. संजय नहार म्हणाले, मराठी अस्मितेचा विषय ज्या वेळी येतो त्या वेळी राज ठाकरे हे कायम पुढे असतात. दिल्ली काबीज करायची आजही मराठी माणसात कुवत आहे, असे त्यांनी आवर्जून सांगितले.



# कार्यकर्त्यांनी अडवला अजित पवार यांचा ताफा

बारामती । प्रतिनिधी

बारामतीच्या दौऱ्यावर असलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा ताफा राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी शहरातील कसबा भागात अडवला. 'तुम्ही तुमची उमेदवारी जाहीर केल्याशिवाय येथून गाड्यांचा ताफा हलू देणार नाही', अशी भूमिका या कार्यकर्त्यांनी घेतली. पवार यांनी मोटारीतून बाहेर येत तुमच्या मनातीलच उमेदवार बारामतीत दिला जाईल, असे आश्वासन दिले. त्यानंतर कार्यकर्त्यांनी त्यांचा ताफा पुढील कार्यक्रमासाठी जावू दिला.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे मंगळवारी बारामती दौऱ्यावर होते. सकाळी त्यांच्या उपस्थितीत शहरात उद्योजकांचा मेळावा पार पडला. त्यानंतर ते सोलापूर येथे कार्यक्रमाला जावून पुन्हा बारामतीत पोहोचले. माळेगाव बुद्रूक येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नामकरणाचा कार्यक्रम उरकून ते पुढील कार्यक्रमासाठी झारगडवाडीकडे शहरातून जात असताना सोमेश्वरनगर व तालुक्यातून बहुसंख्येने आलेल्या कार्यकर्त्यांनी त्यांचा ताफा शहरातील कसबा भागात अडवला. पोलिसांची सुरक्षा भेदून काही कार्यकर्ते थेट त्यांच्या ताफ्यातील मोटारींपुढे आडवे उभे राहिले. त्यांनी हा ताफा पुढे जाण्यापासून रोखला. जोपर्यंत पवार हे बारामतीतून स्वत:ची उमेदवारी जाहीर करत नाहीत तोपर्यंत पुढे जावू देणार नाही अशी भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली. यावेळी पवार यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. सुमारे १५ ते २० मिनिटे हा गदारोळ सुरू होता, पवार यांना पुढे जाणे अशक्य झाल्याने ते अखेर मोटारीतून बाहेर आले. त्यांनी कार्यकर्त्यांना अभिवादन केले. तुमच्या मनातील उमेदवारच इथे असेल असे आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर कार्यकर्त्यांनी त्यांचा रस्ता मोकळा करून दिला.

# बीट मार्शलच्या प्रसंगावधानामुळे लुटारू जेरबंद

पुणे । प्रतिनिधी

पाषाण-सूस टेकडीवर फिरायला गेलेल्या महाविद्यालयीन तरुणाला कोयत्याचा धाक दाखवून लुटणार्या चोरट्यांना चतु:शृंगी पोलिसांनी अटक केली. चोरट्यांकडून दुचाकी आणि कोयता जप्त करण्यात आला. रात्रीच्या वेळी गस्तीवर असलेल्या बाणेर बीट मार्शलच्या कर्तव्यामुळे या गुन्ह्याचा छडा लागला आहे. अजिंक्य अशोक बोबडे (वय १८, रा. गुरुकृपा बिल्डिंग, वाघजाई चौकाजवळ, नवी सांगवी), निखिल बाबासाहेब डोंगरे (वय १८, रा. साकेत सोसायटी, डीपी रस्ता, औंध) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याबाबत पौजेंदाई कामेई (वय १९, सध्या रा. गंगानगर, जुनी सांगवी) याने चतु:शृंगी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती.

कामेई मूळचा नागालँडचा आहे. तो पुण्यात शिक्षणासाठी आला आहे. औंध भागातील एका महाविद्यालयात तो शिक्षण घेत आहे. कामेई आणि त्याचा मित्र समीर रॉय २८ सप्टेंबर रोजी बाणेर परिसरातील पाषाण-सूस रस्त्यावरील टेकडीवर फिरायला गेले होते. त्या वेळी बोबडे, डोंगरे आणि त्यांच्याबरोबर असलेल्या दोन अल्पवयीनांनी कामेई आणि त्याचा मित्र रॉय यांना कोयत्याचा



धाक दाखविला. त्यांच्याकडील दोन मोबाईल, रोकड असा २० हजार रुपयांचा मुद्देमाल लुटून चोरटे पसार झाले. घाबरलेल्या कामेई आणि त्याच्याबरोबर असलेल्या मित्राने चतु:शृंगी पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली होती.

दरम्यान, बाणेर बीट मार्शलला एका दुचाकीवर तीन व्यक्ती संशयास्पद येत असल्याचे दिसले. त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिस उपायुक्त हिंमत जाधव, सहायक आयुक्त अनुजा देशमाने यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक महेश बोळकोटगी, विजयानंद पाटील, सहायक निरीक्षक नरेंद्र पाटील, उपनिरीक्षक प्रवीण चौगुले, हवालदार श्रीकांत वाघवले, बाबुलाल तांदळे, बाबा दांगडे, इरफान मोमीन, श्रीधर शिर्के, श्रीकांत साबळे, प्रदीप खरात यांनी ही कारवाई केली.

पोलिस अंमलदार श्रीकांत साबळे आणि सचिन बिरंगळ हे दोघे बाणेर मार्शल कर्तव्यावर होते. रात्री दोनच्या सुमारास पॅन कार्ड क्लब रोड परिसरात गस्त घालत होते. त्या वेळी काही संशयित व्यक्ती एका दुचाकीवरून जाताना दिसले. त्यांना थांबण्याचा इशारा केला. मात्र, त्यांनी पळ काढला. दोन पोलिसांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. या वेळी दोघे पळून गेले, तर एकजण पोलिसांच्या हाती लागला, तर इतर दोघांनादेखील पोलिसांनी त्याच रात्री पकडले.

### गरबा खेळताना हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने कलाकाराचा मृत्यू

राजगुरुनगर : येथील एका नवरात्रोत्सव मंडळाच्या कार्यक्रमात गरबा नृत्यकलेचे प्रदर्शन करताना नृत्यकलेत निपुण असलेल्या कलाकाराचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने जागीच मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (दि. ७) रात्री दहाच्या सुमारास घडली.



अशोक माळी (रा. माळीमळा, राजगुरुनगर, मूळ गाव होळ, ता. शिंदखेडा, जि. धुळे) असे या कलाकाराचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

माळी हे खानदेशी नृत्यकलेत निपुण होते. गरबाकिंग म्हणूनही त्यांना ओळखले जात होते. नोकरी व्यवसायानिमित्त ते राजगुरुनगर येथे वास्तव्याला होते. एका लहान मुलासोबत ते रास दांडिया खेळायला आले होते. काही वेळानंतर ते जागेवरच कोसळले. आयोजकांनी उपचारासाठी त्यांना खासगी रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.



# शरद पवार यांची बोपदेव घाटात घटनास्थळी भेट

पुणे - बोपदेव घाटात तरुणीवर लैंगिक अत्याचार झालेल्या प्रकरणात पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे. दरम्यान, ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी मंगळवारी (ता. ८) दुपारी बोपदेव घाटात घटनास्थळी भेट दिली. या वेळी पवार यांनी पोलिस तपासाबाबत माहिती घेतली.

बोपदेव घाटात गुरुवारी (ता. ३) रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास महाविद्यालयीन तरुणी मित्रासह फिरण्यास गेली होती. त्यावेळी अज्ञात तीन व्यक्तींनी दोघांना कोयत्याचा धाक दाखवून बांबूने मारहाण केली. त्यानंतर तिघांनी त्या तरुणीवर लैंगिक अत्याचार केला. या घटनेमुळे पुण्यासह संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. या गुन्ह्याचा तपास पोलिसांकडून युद्धपातळीवर सुरू आहे. दरम्यान, शरद पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी आज दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास बोपदेव घाटात घटनास्थळी भेट दिली. तसेच, या प्रकरणात सुरू असलेल्या पोलिस तपासाबाबत पोलिस उपायुक्त आर. राजा यांच्याकडून माहिती घेतली.

# घराबाहेर काढल्याने बेरोजगार तरूणाकडून वडिलांचा खून

दौंड । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील दौंड शहरात घराबाहेर काढल्याच्या कारणावरून एका बेरोजगार तरूणाने रागाच्या भरात वडिलांचा खून केला आहे. शहरातील साठेनगर भागात ही घटना घडली.


दौंड पोलिस ठाण्याचे निरीक्षक गोपाळ पवार यांनी या बाबत माहिती दिली. सुनील लक्ष्मण रणदिवे (वय-५७, रा. साठेनगर, दौंड) असे मृत वडिलांचे नाव आहे. सुनील रणदिवे यांचा मुलगा सचिन सुनील रणदिवे (वय-३५) हा विवाहित असून कौटुंबिक वादातून त्याची पत्नी सोलापूर येथे माहेरी निघून गेली होती.

तिला परत आणण्यासाठी सचिन गेला असता तिने येण्यास नकार दिल्याने तो ६ ऑक्टोबर रोजी दौंड येथे परतला. त्या रागाच्या भरात सचिन याने आईवडिलांशी वाद घातला. त्याला समजावण्याचा प्रयत्न करूनदेखील तो ऐकत नसल्याने दुपारी दोन वाजता सुनील रणदिवे यांनी त्याला घराबाहेर काढून घराला कुलूप लावले.

रविवारी रात्री सचिन हा घरी परतला व रागाच्या भरात त्याने घरासमोर झोपलेल्या वडिलांच्या डोक्यात त्याने काँक्रीट पेव्हर ब्लॉक मारला. गंभीररित्या जखमी झालेल्या सुनील रणदिवे यांच्यावर दौंड उप जिल्हा रूग्णालयात प्रथमोपचार करून पुणे येथील ससून सर्वोपचार रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. परंतु ७ ऑक्टोबर रोजी उपचार सुरू असताना त्यांचे निधन झाले. दौंड पोलिस ठाण्यात या प्रकरणी सुनील रणदिवे यांची पत्नी जयश्री सुनील रणदिवे यांच्या फिर्यादीनुसार सचिन याच्याविरूध्द खून केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन याला अटक करण्यात आली आहे.

# पुण्यातील खंडोबा मंदिरासाठी २४ एकर जमीन, शासन निर्णय जारी

पुणे जिल्ह्याच्या खेड तालुक्यातील मौजे निमगाव येथील निमगाव खंडोबा() मंदीर देवस्थान परिसराचा रोपवे व अन्य पायाभूत सुविधांच्या निर्मितीद्वारे विकास करण्यात येणार असून तेथील आध्यात्मिक, तीर्थक्षेत्र पर्यटनाला चालना मिळणार आहे. त्यासाठी परिसरातली सुमारे शंभर कोटी रुपये किमतीची २४ एकर शासकीय गायरान जमीन जिल्हा परीषदेकडे वर्ग करण्यात आली आहे. त्यासंबंधीचा शासननिर्णय आज जारी करण्यात आला. राज्यातील आणि राज्याबाहेर भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या निमगाव खंडोबा देवस्थानाच्या विकासासाठी उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार ( ) यांच्या पुढाकाराने हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. निमगाव खंडोबा हे गाव पुणे जिल्ह्यात पुणे- नासिक





मार्गावरील खेड तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या राजगुरूनगर पासून ६ किमी अंतरावर आहे.

राज्याच्या महसूल व वन विभागाने आज ८ ऑक्टोबर २०२४ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार मौजे निमगाव येथील गट क्रमांक १३५ मधील १४ हे. ४० आर. गायरान आणि शासकीय जमीन रोपवे व सार्वजनिक सुविधांच्या बांधकामासाठी जिल्हा परिषदेकडे मोफत वर्ग करण्यात आली आहे. जमिनीचा ताबा घेतल्यानंतर तीन वर्षांच्या आत मंजूर प्रयोजनासाठी जमिनीचा वापर सुरू करणे तसेच या भागात वृक्षलागवड करणे बंधनकारक आहे. निमगाव खंडोबा देवस्थान प्राचीन, ऐतिहासिक महत्वाचे आध्यात्मिक स्थान असून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह महाराष्ट्र आणि देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. या मंदिर परिसराचा विकास व्हावा यासाठी नितीन गडकरी यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार आग्रही आणि प्रयत्नशील होते. त्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधीत अधिकाऱ्यांची बैठक घेऊन मौजे निमगाव येथील २४ एकर शासकीय गायरान जमिन निमगाव खंडोबा मंदीर देवस्थान परिसराच्या विकासासाठी जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याचा निर्णय घेतला. त्यासंबंधीचा शासननिर्णय आज जारी आला. हा निर्णय जाहीर झाल्याने राज्यातील तसेच राज्याबाहेरील भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण असून या निर्णयामुळे मौजे निमगाव खंडोबा देवस्थान परिसराच्या विकासाला लवकरच गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# बारामती विधानसभेतून अजित पवारच निवडणूक लढणार; प्रफुल पटेल यांची घोषणा

बारामती : लोकसभेला बारामती मतदारसंघात जे घडलं त्यानंतर आता आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मोठ्या चर्चा सुरू आहेत. अशातच उपमुख्यमंत्री अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे () राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे बारामती विधानसभेतूनच ( ) लढणार असल्याचे बोलले जात होते. याबाबत एबीपी माझाला पक्षातील वरिष्ठ सूत्रांनी खात्रीशीर माहिती दिली होती, त्या बातमीवर आता शिक्कामोर्तब झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांनी याबाबतची घोषणा केली आहे.



विधानसभेतून निवडणूक लढणार

सध्या अजित पवार विविध मतदारसंघात लढण्यासंदर्भात आढावा घेत असल्याची चर्चा तथ्यहीन अजित पवारच बारामती असल्याचीही माहिती पुढे आली आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत ( २०२४) अजित पवार आपल्या पारंपारिक मतदारसंघ असलेल्या बारामती विधानसभेतूनच लढणार यावर आता जवळ जवळ शिक्कामोर्तब झाले आहे. अजित पवार बारामतीतून लढणार की शिरूरमधून अशा चर्चा देखील सुरू होत्या.

अजित पवार बारामती विधानसभेतूनच लढणार!

लोकसभेप्रमाणे आता विधानसभा निवडणुकीमध्ये बारामती मतदारसंघामध्ये पवार विरूध्द पवार अशी लढत होण्याची शक्यता आहे. राज्यभरात लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने महायुतीला जोरदार फटका दिला आहे. त्यामुळेच आगामी निवडणुकीच्या अनुषंगाने सध्या त्यांच्याकडे येणाऱ्यांची नेत्यांची संख्या दिवसागणिक वाढताना दिसते आहे. त्यातून शरद पवारांना भेटणासाठी येणाऱ्यांचीही रांग आता वाढत चालल्याचं दिसतं आहे. अशातच लोकसभेचा धसका घेत अजित पवार हे काहीशी सावध भूमिका तर घेत नाहीये ना? त्यातूनच अजित पवार हे बारामती विधानसभेतूनच लढत नाहीये ना? असे अनेक प्रश्न या निमित्याने राजकीय वर्तुळातून उपस्थित केले जात होते. त्या चर्चांवर आज प्रफुल पटेलांनी पडदा टाकला आहे.

# वाघोलीत डंपरच्या धडकेत महिलेचा जागीच मृत्यू

पुणे । प्रतिनिधी

नगर महामार्गावर वाघोली ते लोणीकंददरम्यान सकाळी व सायंकाळी ठरलेल्या वेळेत अवजड वाहतुकीला बंदी असताना नियमांचे उल्लंघन करून भरधाव डंपरच्या धडकेने दुचाकीवरील महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर तिचा पती जखमी झाला आहे. ही घटना नगर महामार्गावर चितळे स्वीट होमसमोर रविवारी (दि. ६) सकाळी पावणेदहाच्या सुमारास घडली.

वाहतूक नियमांचे बिनधास्तपणे उल्लंघन करून अवजड वाहने वेगाने धावत असल्याने आत्तापर्यंत झालेल्या अपघातांत अनेकांना जीव गमवावा लागला. गेल्या बारा दिवसांतील हा दुसरा बळी आहे. सिरीचंदना विश्वनाथ हेवटम (वय ३२, रा. न्याती ईलान, वाघोली, मूळ रा. आंध प्रदेश), असे मृत्युमुखी पडलेल्या महिलेचे नाव आहे, तर त्यांचे पती विश्वनाथ हे जखमी झाले. सिरीचंदना व विश्वनाथ आणि त्यांचे मित्र, असे दोन दाम्पत्य सकाळी बॅडमिंटन खेळण्यासाठी बायफ रोडवर गेले होते. तेथून परत येत असताना विश्वनाथ यांच्या दुचाकीला भरघाव डंपरची धडक बसली. यात सिरीचंदना या डंपरच्या मागील चाकाखाली आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर नगर महामार्गावर वाहतूक कोंडी झाली. अपघातानंतर डंपरचालक डंपरसह पळून गेला. पोलिस आल्यानंतर अर्ध्या तासाने सिरीचंदना यांचा मृतदेह ससून रुग्णालयात नेण्यात आला. गेल्या २४ सप्टेंबर रोजी नगर महामार्गावर रिलायन्ससमोर डंपरच्या धडकेत चैतन्य शिंदे या युवकाचा बळी गेला होता, तर लोहगाव रोडवर आरएमसी डंपरने स्कूल बसला धडक दिली होती.

cmyk